म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २२१८

REFBK-0021555
REFBK-0021555

द
श
प
दी
•
•
•
अ
नि
ल

२८५४
२८।३।७७
काव्य
२२९८

दशपदी • • अनिल

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२९८
दा. क्र.
२९५५५ काव्य
ग्रंथ शाखा

REFBK-0021555

REFBK-0021555

द
श
प
दी
•
•
•
अ
नि
ल

मौज प्रकाशन : २४६
•
पहिली आवृत्ती : ११ सप्टेंबर १९७६
•
© १९७६, आ० रा० देशपांडे
•
मुखपृष्ठ व मांडणी : र० कृ० जोशी
•
किंमत पंधरा रुपये
•
प्रकाशक
श्री० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४००००४
•
मुद्रक
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४००००४

द
श
प
दी
•
•
०
अ
नि
ल

## अनुक्रम


दशपदी-दर्शन अनिल ७
पदचर्या विजया राजाध्यक्ष २४
विराणी ५३
तदात्मता ५४
एक दिवस ५५
आणीबाणी ५६
तळ्याकाठी ५७
खेळणी ५८
पावसाळी सांज ५९
दोन वाटा ६०
जुई ६१
श्रावणझड ६२
शरदागम ६३
लावण्य ६४
एकाकी ६५
साथ ६६
गतार्थ ६७
माघ ६८
फाल्गुन ६९
माड ७०
प्रीती ७१
कालव ७२
उशिराचा पाऊस ७३
अदृष्ट ७४
फुलांचे आयुष्य ७५
हलन्त् ७६
सगर्भ ७७
सावल्या ७८
चित्र ७९
स्वान्त ८०
झाले ८१
नाटक ८२
जीवन ८३
काळी ८४
लहरा ८५
दाद ८६
एकरंग ८७
मी ८८
पुन्हा ८९
चाललो ९०
तुझ्याविना ९१
दशपदी : स्थल-काल-छंद ९३

द
श
प
दी
•
•
•
अ
नि
ल

# दशपदी-दर्शन

गेल्या सोळा वर्षांत म्हणजे १९५९ पासून मी ज्या कविता लिहिल्या त्या साऱ्या, एक 'आश्विन' ह्या कवितेचा अपवाद सोडला तर, दहा चरणांच्या आहेत. थोड्याच आहेत. अवघ्या एक उणे चाळीस. अशा दहा चरणांच्या कवितांचा आरंभ 'विराणी' ह्या ७-११-१९५९ च्या कवितेपासून झाला. नंतर माझा 'सांगाती' हा संग्रह ऑक्टोबर १९६१ मध्ये प्रकाशित झाला. तोपर्यंत अशा दहा चरणांच्या तेरा कविता झाल्या होत्या. त्या 'सांगाती' या संग्रहात आहेत आणि ह्या 'दशपदी' संग्रहातही पुनर्मुद्रित करण्यात आल्या आहेत.

विराणी'नंतरच्या पाचसहा कविता दहा चरणांच्याच झाल्या. त्यांना मी 'दशपदी' म्हणू लागलो. माझ्या कवितांविषयी विशेष आस्था असणाऱ्यांत ते नाव रूळले. 'सांगाती'ला जोडलेल्या 'अनिल – एक अभ्यास' ह्या प्रारंभिकात मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष ह्यांनी 'एक नवी वांधणी' असा ह्या दहा चरणांच्या कवितांचा उल्लेख करताना 'दशपदी' हाच शब्द वापरला. आता तो रूढ झाल्यासारखाच आहे.

"'अनिल' हे एक प्रयोगशील कवी आहेत. त्यांनी सतत निरनिराळे प्रयोग करीत राहून आपल्या काव्यात जिवंतपणा ठेवला. गेल्या काही वर्षांत 'दशपदी' हा एक नवीन रचनाप्रयोग ते करीत आहेत." हा मथितार्थ असलेले काही बोलले जाते. लिहिलेही गेले. त्यामागील हेतू चांगलाच असतो. माझ्या कवितेला उचलून धरणाराही असू शकतो. पण मी कवितारचनेचे प्रयोग केले असे काही कुणी म्हटले की ते मला खटकते. बोचतेही. कारण मी एक प्रयोग म्हणून काव्याच्या क्षेत्रात काहीच केलेले नाही. प्रयोगासाठी प्रयोग तर नाहीच नाही. माझ्या मते प्रयोग करणे असा प्रकार काव्य-निर्मितिव्यापाराशी विसंगत आहे. एक प्रयोग म्हणून काव्यसंभव होत नसतो. माझ्या कवितांत काही नवीन प्रयोग आहेत असे कुणाला वाटत असेल तर ती त्याची समीक्षात्मक जाण आहे; कवितेच्या संभवापूर्वीची माझी सहेतुक जाणीव नाही.

पण मी गेल्या सोळा वर्षांत दहा चरणांच्याच कविता लिहिल्या आणि त्यांना 'दशपदी' हे नावही रूढ झाले तेव्हा तो कवितारचनेचा एक प्रकार आहे हे आलेच. त्या प्रकाराचा विचारही करायला पाहिजे. इंग्रजीत 'फॉर्म' ह्या शब्दाचे अनेक अर्थ आहेत. आपण 'पोएट्री इज् अ फॉर्म ऑफ लिटरेचर' असे म्हणतो तेव्हा 'फॉर्म'चा अर्थ 'प्रकार' असा असतो. दशपदीला 'फॉर्म'च्या त्या अर्थाने रचनाप्रकार म्हणता येईल. पण तेवढ्याने भागणार नाही. या प्रकाराच्या बाह्यांगाचा, अंतरंगाचा आणि गाभ्याचाही शोध घ्यावयास पाहिजे.

आता इथे आपल्या स्वतःच्या मनातील सर्जनव्यापाराचा मागोवा घेत लिहिणे भाग आहे. स्वतःच्या अनुभवाच्या साक्षीचा पुरावाच ग्राह्य मानावा लागणार आहे. दुसरा कोणता आधार नाही.

ह्या दशपदी, कविता म्हणून बऱ्या, वाईट कशाही असोत, पण त्या माझ्या भावजीवनातल्या घटना आहेत. माझ्या कवितांसंबंधी

एकेक आहे तो जिवंत क्षण
ऊन रक्ताने अनुभवलेला

असा उद्‌गार आधीच माझ्या 'पेर्तेव्हा' या संग्रहातील 'विशेष' ह्या कवितेत निघालेला आहे. इतरांच्या लेखनाच्या मननातून काढलेल्या वैचारिक निर्णयापेक्षा स्वतःच्या कवितानिर्मितीच्या प्रसंगातून प्रतीत झालेलेच अधिक सुस्पष्ट आणि प्रत्ययकारी तथ्य असते. ह्या धारणेतून मी दशपदीसंबंधी सांगणार आहे.

ह्या कवितांतील पहिले शब्द, पहिली ओळ निघाली तेव्हा आता दहा चरणांची कविता लिहायची असा काही संकल्प माझ्या मनात नव्हता आणि पुढच्या ओळी निघतानाही नसायचा. कवितेचा मध्य असा असला पाहिजे आणि शेवटी एक सौम्य खटका, अनपेक्षित कलाटणी असे काही यायला पाहिजे असाही काही विचार मनात नसायचा. कविता इतक्याच चरणांची असली पाहिजे, त्या कवितेचा मध्य आणि अंत असा असा असावयास पाहिजे हे सारे विचार, कविता म्हणजे एक पूर्वनियोजित 'रचना' असते आणि एक पूर्वनियोजित रचनातंत्र सांभाळीत लिहिली जाते ह्या

कल्पनेतून आलेले असतात. कविता 'घडवलेली' असते हे ठाम मत अशा कल्पनांना कारणीभूत असते. तशा, ज्यांना 'रचना' म्हणता येईल अशा आणि 'घडविलेल्या' कविता नसतात असे नाही. पण त्याहून ज्यांचे वेगळेपण जाणवेल अशा कविताही असतात. जाणकार त्यांना विशुद्ध काव्य, खरी कविता म्हणून ओळखतात. त्या एखाद्या रचनातंत्रानुसार घडविलेल्या नसतात तर घडलेल्या असतात. दशपदी हा जर नुसता रचनाप्रकार असता तर त्यासंबंधी सांगणे सोपे गेले असते. पण दशपदी तसा पूर्वनियोजित रचनाप्रकार नाही. आणि तशा प्रकारे मी दशपदी लिहिल्याही नाहीत.

दशपदी काय नाही हे पाहत असता ती काय आहे हे दिसू लागेल असे मला वाटते. 'दशपदी' हे नाव का दिले हे आधी सांगितले पाहिजे. इंग्रजी काव्यातला 'सॉनेट' हा एक वेगळा रचनाप्रकार म्हणून पहिल्याने केशवसुतांनी मराठी काव्यात प्रकटविला. त्या सॉनेटरचनेला मराठीत 'चतुर्दशपदी', 'चतुर्दशिनी' ही नावे पहिल्याने दिली गेली होती. नंतर 'सॉनेट'ला मराठीत काय म्हणावे ह्याविषयी बरीच चर्चा होऊन 'स्वनीतक', 'स्वनीत', 'सुनीत' अशी नावे सुचविण्यात आली. त्यांतले 'सुनीत' हे नाव आता रूढ झाले आहे. ही नावे सुचविण्यात 'सॉनेट' ह्या शब्दाशी ध्वनिसाम्य साधण्याचा हेतू दिसतो. माझ्या मते 'चतुर्दशपदी' हेच नामाभिधान भारतीय परंपरेला धरून होते आणि योग्यही होते. पद्यबंधांना द्विपदी, त्रिपदी, चतुष्पदी, पंचपदी, षट्पदी, सप्तपदी आणि अष्टपदी अशी नावे भारतीय परंपरेत आधीच दिलेली होती. जयदेवाच्या पद्यबंधाचे 'अष्टपदी' हे नाव तर सुपरिचित झालेले होते. तेव्हा त्याप्रमाणे सॉनेट ह्या चौदा चरणांच्या पद्यबंधाला 'चतुर्दशपदी' हेच नाव योग्य होते. जयदेवाच्या अष्टपदीनंतरचा टप्पा म्हणून दहा चरणांच्या पद्यबंधाला 'दशपदी' म्हणणेच योग्य आणि परंपरेला धरून आहे.

आपल्या छंदःशास्त्रात छंदाच्या घटकांचा आणि गण, मात्रा, अक्षरसंख्या इत्यादींचा पुष्कळ विचार झाला. पण चरणांच्या संख्येनुसार होणाऱ्या पद्यबंधांचा विचार झालेला मला आढळून आला नाही.

द्वाभ्यां युग्म इति प्रोक्तं त्रिभिर्गीतविशेषकं
कलापकं चतुर्भिस्यात् तदूर्ध्वं कुलकं स्मृतम् ॥

असे एक वचन आहे. पण त्यात दोन, तीन, चार आणि त्याहून अधिक चरणांच्या पद्यबंधांना अनुक्रमे युग्म, विशेषक, कलापक आणि कुलक म्हटले जाते एवढेच सांगितले आहे. त्यांत एकच वाक्य असायला पाहिजे असेही बंधन घातले आहे असे इतरत्र दिसते. द्विपदी ते अष्टपदी ही नावे चरणसंख्येची निदर्शक अशीच आहेत. त्यांचा अधिक विचार मला कुठे दिसला नाही.

जयदेवाच्या 'गीतगोविंदा'त ज्यांना 'प्रबंध' म्हटले आहे त्यांना 'अष्टपदी' हे नाव रूढ झाले, पण अष्टपदी म्हणजे काय, तिचा बंध कसा आहे इत्यादीसंबंधी विचार मी पाहिलेल्या 'गीतगोविंदा'च्या टीकाग्रंथांत मला आढळला नाही. तज्ज्ञांना विचारिले असता तसा विचार कुठे आढळला नाही हेच उत्तर मला मिळाले. अष्टपदीत धृव व अभोग असे दोन अवयव आणि पद व बिरुद अशी दोन अंगे असतात, असा संगीतशास्त्राच्या आधारे केलेला उल्लेख मात्र माझ्या पाहण्यात आला. पण हे कथन अष्टपदी कशी गायिली जावी ह्यासंबंधी असावे. पद्यबंधासंबंधी नसेल असे वाटते.

चरणांच्या निश्चित संख्येने सिद्ध होणाऱ्या पद्यबंधांसंबंधी आपल्या छंदःशास्त्रात विचार आलेला नाही. इतकेच नव्हे तर इंग्रजीत ज्याला 'स्टँझा' म्हणतात त्या अर्थाचा शब्दही संस्कृत भाषेत नाही. आपटेकृत इंग्रजी-संस्कृत कोशात स्टँझा म्हणजे श्लोक असे दिले आहे. पण 'श्लोक' हा शब्द आता मराठीत चार चरणांच्या पद्यबंधालाच अधिक वापरला जातो. प्राकृतात मात्र 'कडव' आणि त्यावरून मराठीत आलेला 'कडवे' हा शब्द आहे. पण तो गायनानुकूल रचनेतील ठराविक चरणांचा एक विभाग ह्या अर्थानेच प्रचारात आहे. तसाच 'चौक' हा शब्द पोवाड्याचा एक भाग म्हणून. 'कडवे', 'चौक' हे शब्द स्टँझा ह्या अर्थाचे आहेत, पण ते विशिष्ट पद्यप्रकाराशी निगडित झालेले आहेत. म्हणून माझ्या मुक्तछंदासंबंधीच्या लिखाणात मी 'स्टँझा'ला 'स्तंभ' हा प्रतिशब्द वापरला. तोच 'स्टँझा'च्या सामान्य

अर्थाच्या दृष्टीने मला योग्य वाटतो.

आपल्या छंदःशास्त्रात जरी चरणांच्या नियमित संख्येने सिद्ध होणाऱ्या पद्यबंधांचा विचार आलेला नसला तरी इ० व्हेर्नान आर्नोल्ड ह्यांनी आपल्या 'वेदिक मीटर इन् इटस् हिस्टॉरिकल डेव्हलपमेंट' ह्या अत्यंत व्यासंगपूर्ण ग्रंथात तो केलेला आहे. वैदिक छंदाचे घटक (युनिट्स्) 'व्हर्स', 'स्टँझा' आणि 'हिम्न्' आहेत असे तो दाखवितो. इथे व्हर्स म्हणजे चरण, स्टँझा म्हणजे ऋक् आणि हिम्न् म्हणजे ऋचा अथवा सूक्त अभिप्रेत आहे असे दिसते. स्टँझा (स्तंभ) दोन वा अधिक चरणांचा असू शकतो. वैदिक छंदांतील दोन चरणांच्या स्टँझापासून आठ चरणांच्या स्टँझापर्यंतची उदाहरणे आर्नोल्डने दिली आहेत. आठपेक्षा अधिक चरण असलेल्या स्तंभांची उदाहरणे त्याने दिली नाहीत. तसे स्तंभ वैदिक छंदांत त्याला दिसले नसावेत.

तमिळ भाषेतील प्राचीन म्हणजे खिस्तपूर्व ५०० ते खिस्तोत्तर ६०० ह्या कालखंडातील काव्यात दहा चरणांचा स्तंभ असलेला पद्यबंध आहे आणि त्याला 'दशक' म्हणतात, आणि काही कवींनी पाच चरणांच्या दोन स्तंभांचे एक दशक असा पद्यबंधही रचिलेला आहे, असे मला कळले आहे. पण पहिल्या प्रकारच्या दशकात दहा चरणांचा सलग प्रवाह आहे की पाच स्वयंपूर्ण द्विपदी आहेत हे मला पडताळून पाहता आले नाही.

ठराविक चरणांच्या संख्येने बनणाऱ्या स्तंभाच्या पद्यबंधाचा विचार इथे करण्याचे कारण हे की दशपदी हा एक दहा चरणांचा स्तंभ आहे. पंचपदी, षट्पदी, सप्तपदी आणि अष्टपदी ह्या पद्यबंधप्रकारांसंबंधी ते अनुक्रमे पाच, सहा, सात आणि आठ चरणांचे स्तंभ आहेत असे म्हणता येईल काय ह्याविषयी माझ्या मनात शंका आहे. कारण ते पाच, सहा, सात आणि आठ चरणांचे असतात असे नाही तर तितक्या स्तंभांचेही आहेत. जयदेवाच्या अष्टपदी आठ चरणांच्या नसून आठ द्विपदी स्तंभांच्या आहेत असे दिसते. आता चरणाची लांबी ठराविकच असली पाहिजे हे जर मानले नाही तर एक द्विपदी म्हणजे एक चरण असेही धरून चालता येईल. चरण दाखविण्याच्या पद्धतीवर ते अवलंबून राहील. उदाहरणार्थ,

हिरवे हिरवे गार गालिचे हरित तृणाच्या मखमालीचे

असा एक चरण, किंवा

हिरवे हिरवे गार गालिचे
हरित तृणाच्या मखमालीचे

असे दोन, आणि

हिरवे हिरवे
गार गालिचे
हरित तृणाच्या
मखमालीचे

असे चार चरणही दाखविता येतील.

द्विपदी, त्रिपदी आणि चतुष्पदी म्हणजे अनुक्रमे दोन, तीन आणि चार चरणांचा स्तंभ, इथपर्यंत पद म्हणजे चरण हा अर्थ निश्चित दिसतो. पण पुढे, कुठे कुठे पद म्हणजे एक वेगळा स्तंभ असाही अर्थ मानलेला दिसतो. सामान्यपणे तोच आशय अनवरत असलेल्या पाच स्तंभांना पंचपदी व सहा स्तंभांना षट्पदी म्हटलेलेही दिसते. हरी नारायण आपटे ह्यांनी चौदा चरणांच्या केशवसुतांच्या मराठी सॉनेटला सप्तपदी म्हटले ते दोन चरणांचा द्विपदी स्तंभ म्हणजे एक पद ह्या अर्थाने असावे. दशपदीमध्ये पद म्हणजे एक चरण आणि त्याची एक ओळ असे आहे. पण हे दहा चरण म्हणजे पाच द्विपदी किंवा दोन चतुष्पदी आणि एक द्विपदी असे नाही. अथवा दोन पंचपदीही नाहीत. दशपदी म्हणजे सलग अशा दहा प्रवाही ओळींचा एक स्तंभ आहे.

इंग्रजी सॉनेटचे किंवा मराठी सुनीताचे जसे अष्टक आणि षटक, दोन षटक आणि एक द्विपदी, एक अष्टक आणि दोन

त्रिपदी, तीन चतुष्पदी आणि एक द्विपदी आणि असेच आणखी खंड पडू शकतात, तसे दशपदीचे नाही.

सॉनेटमध्ये यमकयोजनेच्या विशिष्ट पद्धती असतात. तशा काही यमकपद्धती दशपदीत नाहीत. मराठी पद्धतीप्रमाणे दोन सलग चरणांच्या अंती यमक आहे. मी लिहिलेल्या दशपदी सयमक आहेत, पण तशा असल्याच पाहिजेत असा आग्रह धरण्याचे कारण नाही. चरणाच्या मध्ये अंतर्गत यमकासारखे आणि शिवाय अंतीही यमक येऊ शकेल.

अमुक एक वृत्त, जाती वा अक्षरछंद दशपदीला अधिक योग्य, असेही नाही. चरणात नियमित अक्षरसंख्या असली पाहिजे असेही नाही. माझ्या काही दशपदी मुक्तछंदात आहेत. त्यांच्या चरणांतील अक्षरसंख्या ठराविक नाही. कुठे दोन चरण सारख्या अक्षरसंख्येचे असले तर तसे आपाततः झालेले आहे, हेतुपूर्वक नाही. मुक्तछंद निर्यमक असला पाहिजे असे नाही. तो सयमकही असू शकतो. मुक्तछंदातील एका चरणाची मात्रासंख्या अमुकच असली पाहिजे ही अपेक्षाच असू शकत नाही. क्वचित दोन चरणांची मात्रासंख्या सारखीच भरेल, पण तसा नियम मात्र नाही.

माझ्या काही दशपदींचे छंद 'जाति' आहेत. त्या छंदप्रकाराचे नियम आणि बंधने पाळणे मात्र अवश्यच असते.

इंग्रजी सॉनेटमध्ये आणि मराठी सुनीतात आशयाचेही खंड दाखविता येतात. अष्टकात काव्याशयाची मांडणी आणि विकास तर षटकात उत्कर्ष आणि परिणती. अष्टकात भावना तर षटकात विचार, अष्टकात एक पक्ष तर षटकात दुसरा. अष्टकात आणि षटकात विरोध, विरोधाभास आणि केव्हा समतोल असे अभिव्यक्तीचे प्रकारही जाणवतात. काही सॉनेट्स तर असे आहेत की त्यांत अष्टक आणि षटक हे दोन वेगळे पद्यबंधच आहेत असे दिसते. आठव्या किंवा नवव्या चरणात अष्टकातील आशयाला विराम देऊन पुढच्या षटकातील आशयाशी त्याची जुळणी साधावी लागते. पहिल्या बारा चरणांचा आणि शेवटल्या दोन चरणांचा असे दोन खंड असले तर पहिल्या बारा चरणांत विस्तार केलेल्या आणि उत्कर्षबिंदू गाठलेल्या आशयान्ना शेवटल्या दोन चरणांत समारोप, उपसंहार असतो. तो केव्हा सुभाषितासारखा, केव्हा चमत्कृतिजनक, तर केव्हा कलाटणीसारखा करण्याचीही पद्धती आहे. सॉनेटमधील आशयाची अभिव्यक्ती एखादी लाट जोराने समुद्रकिनाऱ्यावर यावी आणि फुटून परत फिरावी तशी असते. आशयाचा चढउतार असावयास पाहिजे

असेही म्हटले जाते. तसे दशपदीच्या अभिव्यक्तीत असावयास पाहिजे असे नाही. कुठे जाणवत असेल तर ते हेतुपूर्वक नाही.

दशपदी म्हणजे पाच द्विपदी, दोन चतुष्पदी आणि एक द्विपदी, दोन पंचपदी, एक अष्टपदी आणि एक द्विपदी, असे नाहीच. म्हणून ती तसे खंड दिसतील अशा रीतीने मुद्रित करू नये हा माझा आग्रह असतो. पण कुठे कुठे ते दुर्लक्षिला गेला. त्यामुळे दशपदी हा एक स्तंभ (स्टँझा) आहे ही पद्यबंधाची कल्पनाच तिथे नष्ट झाली आहे.

दशपदीतील एक चरण म्हणजे एक स्वयंपूर्ण, स्वतंत्र वाक्य असते असे म्हणता येण्यासारखे काही चरण असतील, पण तो दशपदीचा विशेष मात्र नाही. पुष्कळदा एकापेक्षा अधिक ओळींचे वाक्य आहे आणि काही ठिकाणी संपूर्ण दशपदीच म्हणजे एक वाक्य मानता येईल.

ह्याआधीच्या मुद्रणात दशपदींच्या काही चरणांत स्वल्पविरामाचे चिन्ह दिले गेले होते, पण आता ते काढून टाकले आहे. पूर्णविरामाचे चिन्ह तर नव्हतेच. विरामचिन्हे ह्या इंग्रजीतून आलेल्या प्रकरणाचा मुलाहिजा बाळगू नये असे काही माझ्या मनात नव्हते, नाही. दशपदीतील विशेषणे, क्रियाविशेषणे आणि क्रियापदेही अभिव्यक्तीच्या वेळी मागल्या तशाच पुढल्या शब्दांशी संबंध ठेवत आल्यामुळे ती देहलीदीपासारखी आतबाहेर, मागेपुढे प्रकाश टाकणारी वाटली. विरामचिन्ह दिले असते तर तसे राहिले नसते. बहुतेक ठिकाणी वाक्य एक अथवा अधिक चरणांच्या अंतीच संपलेले असते आणि वाचनात ते सहजपणे जाणवते. म्हणून पूर्णविरामाची आवश्यकताच नसते.

इतर विरामचिन्हे नाहीत, पण प्रत्येक दशपदीच्या शेवटी उद्गारचिन्ह मात्र आहे. बहुतेक दशपदींत कलाटणी म्हणण्याइतका तीव्र नसला तरी सौम्य खटका आहे, म्हणून उद्गारचिन्ह असावे, असे मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष 'सांगाती' संग्रहाच्या 'अनिल – एक अभ्यास' ह्या प्रारंभिकात म्हणतात. पण मी मात्र त्यासाठी उद्गारचिन्ह दिलेले नाही, तर सबंध दशपदी हा एक उद्गार आहे म्हणून. तिची अभिव्यक्ती स्वतःचा स्वतःशी उद्गार अशी आहे म्हणून.

दशपदी जर सयमक असेल, तर सुनीताप्रमाणे तीत यमकयोजनेची विशिष्ट पद्धती नाही हे आधी सांगितलेच आहे.

यमक म्हणजे चरणातील शेवटचे अक्षर आणि त्यापूर्वीचा स्वर ह्यांची पुनरावृत्ती एवढेच नाही. अधिकही आहे. निरनिराळ्या प्रकारची यमके ह्या दशपदींत आलेली आहेत. मात्र ती कृत्रिमपणे जुळवलेली नसावीत तर नादाच्या आणि नादमूल्यांच्या साम्याने, साहचर्याने आणि त्यांच्या जाणिवेतून सहजपणे निघालेल्या शब्दांची असावीत. क्रियापदांची यमके नुसते यमकाचेच कार्य करीत नाहीत, तर आशयाच्या अभिव्यक्तीला गती देण्याचे कार्यही करतात, आणि म्हणूनच ती येतात. तोच शब्द यमक म्हणून लागोपाठ येत राहतो तिथे तो शब्दच आशयात्मक, आशयाचा कारक आणि प्रेरक असतो म्हणून. ह्या माझ्या जाणिवा;— उणिवा इतरांना जाणवतील.

आता दशपदीत इतके आणि असे नाही तर दहा चरणांचे बंधन तरी का असावे, कमीअधिक चरण का असू नयेत, असा प्रश्न कुणी विचारणे शक्य आहे. वास्तविक हा प्रश्न कवितेविषयीचा आहे. पद्यबंधाविषयीचा नाही, असू शकतही नाही. कविता कितीही चरणांची असू शकते. पण विशिष्ट पद्यबंध ठराविक चरणांचाच असावा लागतो. सॉनेटचा पद्यबंध चौदा ओळींचाच असला पाहिजे हे आता ठरून गेले. कमीअधिक चरणांचा सॉनेट लिहिण्याचा प्रयत्न झाला, पण तो मान्य झाला नाही. आता कोणी तेरा किंवा पधरा चरणांची कविता लिहिली तर तिला सॉनेट म्हणा असा आग्रह धरता येणार नाही. त्यात पद्यबंधासारखे काही जाणवले तर त्याला वेगळे नाव द्यावे लागेल. तसेच दशपदीचे. पण खरा प्रश्न हा असावयास पाहिजे की अशा पद्यबंधातल्या कवितेत जो आशय अभिव्यक्त होतो तो चौदा चरणांच्या सॉनेटमध्ये किंवा दहा चरणांच्या दशपदीतच का बसावा, कमीअधिक चरणांत का नसावा? ह्या खऱ्या प्रश्नाचे उत्तर पुढे योग्य ठिकाणी देण्याचा प्रयत्न करीन.

हे मात्र इथेच सांगणे अवश्य आहे की निव्वळ चौदा चरणांची कविता लिहिल्याने सॉनेट होत नाही आणि निव्वळ दहा ओळींची कविता लिहिल्याने दशपदी होत नाही. एखाद्या कवीची एखादी कविता दहा ओळींत संपूर्ण झाली असेल, पण

तसे आपाततः झालेले आहे की नाही ह्याची जाणीव होऊ शकेल काय? पुढील विचार ह्यासंबंधी थोडेबहुत तरी साहाय्य-कारक होतील ही आशा धरून आहे.

इथपर्यंत दशपदी काय नाही आणि तदनुषंगाने काय आहे हेच सांगून झाले. तेही दशपदीच्या बहिरंगासंबंधीच. अंतरंगाचा विचार आता करायला पाहिजे. हे काम चांगलेच अवघड आहे. कारण त्यासंबंधी वापरण्यात येतील ते शब्द आणि त्यांचे अर्थ साधारणपणे कळतात, पण त्यांचे निर्वचन, लक्षण, व्याख्या शब्दांत करणे कठीण जाते. अगदी संपूर्णपणे करणे तर अशक्यप्राय. त्या शब्दांच्या अर्थाविषयी एकवाक्यताही सहसा असत नाही. ज्या वस्तूंविषयी फार कुतूहल असते आणि हव्याहव्याशा वाटतात त्यांचीसुद्धा व्याख्या करणे कठीण जाते. म्हणूनच आपण "काय वर्णूं आतां न पुरे ही वाणी" असे बोलून मोकळे होतो. पण आपली समज तपासली, सामान्य व्यवहारज्ञान वापरले, अवश्य तेवढेच सांगितले आणि अवास्तव असे काही म्हटले नाही तर तात्पर्य कळण्याइतका अर्थ विशद करता येतो.

दशपदी हा कवितेचा एक 'फॉर्म' आहे काय आणि वेगळा म्हणता येईल काय ह्या प्रश्नाचा विचार करण्यापूर्वी 'फॉर्म' ही काय संकल्पना आहे हे समजून घेतले पाहिजे. इंग्रजीत 'फॉर्म' ह्या शब्दाचे पुष्कळ अर्थ आहेत. त्यांतला एक अर्थ प्रकार हा आहे, हे आरंभीच येऊन गेले आहे. आता साहित्यात, विशेषतः काव्यात आणि इतर कलांत जी 'फॉर्म'ची संकल्पना आहे तिचा विचार करायचा आहे. 'फॉर्म'ला भारतीय भाषांत 'रूप' हा प्रतिशब्दच योग्य आहे. तोच मी पुढे 'फॉर्म' ह्या अर्थी वापरणार आहे.

फॉर्मसंबंधी पाश्चात्त्य तत्त्वचिंतकांनी आणि कलाभिज्ञांनी पुष्कळ विचार केला आहे आणि त्याचा आपल्याला इंग्रजी माध्यमातून परिचय झालेला आहे. पण तिथेही शब्दांत स्पष्ट करण्याची अडचण आहेच. फॉर्मचे निश्चित ज्ञान करून देणारे मोजके आणि अवतीभवतीचे वर्णनात्मक फार असे जाणवत राहते. फॉर्मचा साध्या शब्दांतील इंग्रजी-कोशगत अर्थ "रिलेटिव्ह ग्रुपिंग ऑफ द पार्ट्स ऑफ अ थिंग" असा आहे. तो भारतीय न्यायशास्त्राच्या "अवयव-

संस्थानविशेष" ह्या परिभाषेशी मिळताजुळता वाटतो. तसाच "अरेंजमेंट अँड स्टाइल इन लिटररी ऑर म्युझिकल कॉंपोझिशन" हा. ललितकलांच्या संबंधात "ऑर्गनायझेशन, प्लेसमेंट ऑर रिलेशनशिप ऑफ बेसिक एलिमेंट्स सो ॲज टु प्रोड्यूस अ कोहिरंट इमेज".

आता इथे फॉर्म कशाचा असतो हा प्रश्न उपस्थित करणे विषयास धरून होईल. फॉर्म आशयाचा (कंटेंटचा) असतो. फॉर्मला स्वतंत्र अस्तित्व असूच शकत नाही. ह्याचा विसर पडावा असेही विवेचन कुठे कुठे पाहावयास मिळते. म्हणून इथे फॉर्म हा आशयाचाच असतो ह्याचा पुनरुच्चार ठसठशीतपणे करणे अवश्य आहे.

हर्बर्ट रीडने 'ऑर्गॅनिक' आणि 'ॲब्स्ट्रॅक्ट' असे फॉर्मचे दोन प्रकार मानले आहेत. त्यांना 'सावयवी' आणि 'निरवयवी' म्हणता येईल किंवा 'सेंद्रिय'-'निरिंद्रिय', 'प्रतिरूप'-'अप्रतिरूप' असे पर्यायही वापरता येतील. पण त्यांत हर्बर्ट रीडने ज्या अर्थाने हे शब्द वापरले आहेत तो सर्व अर्थ येणार नाही. फॉर्मचे 'कायिक' आणि 'मानसिक' असेही दोन प्रकार मानले जाऊ शकतात.

ललितकलांतील 'फॉर्म' ज्ञानेंद्रियांद्वारे ग्रहण करता येईल आणि मनानेही ग्रहण करता येईल असा असतो. पण काव्येतर ललितकलांमध्ये इंद्रियाद्वारे ग्रहण करण्याची क्रिया अधिक असते तर काव्यामध्ये मनाने ग्रहण करण्याची.

माझ्या मते भारतीय न्यायशास्त्राने गणना केलेल्या गुणांपैकी सर्वांनी मानलेल्या रूप ह्या गुणविशेषाचा अधिक विचार आणि काही विस्तार केला तर फॉर्मच्या संकल्पनेची आपल्याला अधिक सुस्पष्टपणे जाणीव करून घेता येईल, वाढविताही येईल. गुण म्हणजे 'क्वालिटी'.

आता इथे रूप ह्या गुणावर न्यायशास्त्राने घातलेल्या मर्यादा पाहिल्या पाहिजेत. "चक्षुर्मात्र ग्राह्यो गुणो रूपम्" म्हणजे "डोळ्यानेच मात्र ज्याचे ग्रहण करता येते (बोध होतो) तो गुण म्हणजे रूप" असे लक्षण बांधल्यामुळे रूप म्हणजे रंग हे मानणे भागच पडले. पण इतके आकुंचित लक्षण काही नैय्यायिकांना मान्य नाही. ते रूप त्वग्ग्राह्यही मानतात. त्यांच्या मते नुसता रंगच नाही तर आकृती, आकारविशेष हेही रूप ह्या गुणात अंतर्भूत करावयास पाहिजेत.

रूप हे चक्षुर्मात्र असे एकेंद्रियग्राह्यच नाही तर चक्षू आणि त्वग् असे द्वीन्द्रियग्राह्य आणि अतींद्रियग्राह्यही आहे. अतींद्रिय ह्या शब्दाचा इंद्रियज्ञानाच्या पलीकडे हा एक अर्थ आणि मन हा दुसरा.

असा रूप ह्या गुणाचा विस्तारित अर्थ मला अधिक पटतो. गुण हा द्रव्य ह्या पदार्थात, त्याच्या आश्रयावर किंवा आधारावर असतो. त्याला स्वतंत्र वस्तुत्व नाही. पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश, काल, दिक्, आत्मा आणि मन ही नऊ द्रव्ये मानली आहेत. द्रव्य म्हणजे 'सब्स्टन्स'.

इतके प्राथमिक स्वरूपाचे स्पष्टीकरण अवश्य नसायला पाहिजे, पण आहेही असे वाटावे अशी परिस्थिती मला 'फॉर्म' ह्या विषयाची चर्चा करताना आणि त्यासंबंधीचे लेखन वाचताना फार जाणवते. केव्हा माझी समज उणी पडत असेल; केव्हा त्यांची.

मला इथे काव्य ह्या अंतरंगकलेविषयीच मुख्यत्वेकरून विचार करायचा आहे. आता मी 'ललितकला' हा रूढ शब्द वापरत नाही. का हे सांगत बसलो तर उगाच विषयांतर होईल. सर्वच अंतरंगकलांतील रूप (फॉर्म) म्हणजे काय हे एका सूत्रात सांगता येईल काय? काहीसे शक्य; बरेचसे अशक्य.

पहिल्यानेच म्हणून ठेवले की काव्यातील रूप (फॉर्म) आशयाचे असते. त्या रूपाला स्वतंत्र अस्तित्व नसते—नाही. आता रूप म्हणजे काय हे सांगायला पाहिजे. एका अनाकलनीय शब्दाचा त्याहून अनाकलनीय असे दोनचार शब्द वापरून अर्थ सांगण्यापेक्षा रूप अनिर्वचनीय आहे हे प्रामाणिकपणे मान्य करणे मला बरे वाटते. अवतीभवतीच्या कितीतरी गोष्टी अशा अनिर्वचनीय असतात, आहेत. आता कुणी म्हणेल की रूप जर अनिर्वचनीय आहे तर त्यासंबंधी इतके कसे सांगितले जाते, लिहिले जाते? तर ते सारे त्या रूपाचे स्वतःला घडलेले दर्शन असते. ते दर्शन परिपूर्ण आहे असे सांगणाऱ्याचा आग्रही वाद असतो, पण तो तितकाच खरा. पुष्कळांनी मान्य केला तर बराच खरा म्हणण्याइतका. आता रूप हे आशयाचे असते असे म्हटले तर त्यांचा संबंध काय हे सांगावे लागेल. माझ्या मते कवितेतला आशय आणि त्याचे रूप ह्यांचा संबंध 'समवाय'संबंधासारखा असतो.

'समवाय' म्हणजे नित्यसंबंध. इंग्रजीत 'को-इन्हिरन्स्'. हा संयोगसंबंधाहून अगदी भिन्न. समवाय हा पदार्थ तर संयोग हा गुण. समवाय म्हणजे दोन वस्तूंची अशी युती की त्या दोन्हीही नाहीशा केल्याविना वेगळ्या होणारच नाहीत. जसे सोने आणि त्याचा रंग. कवितेतील आशय आणि कवितेचे रूप ह्यांचा असाच समवायसंबंध आहे.

आशय (कंटेंट) आणि विषय (सब्जेक्ट) ह्यांचा पुष्कळदा घोटाळा होत राहतो म्हणून कवितेतला आशय म्हणजे विषय नाही हे वारंवार सांगत राहावेसे वाटते. सहृदय रसिकांना आणि जाणकारांना ज्या एखाद्या कवितेत उत्तम काव्य जाणवते त्या कवितेतला आशय आणि रूपबंधही उत्तमच असतो. हा आशय आणि रूपबंध कुठून येतो, कसा प्रकट होतो, ह्याचा विस्तृत विचार करू म्हटले तर फार खोलात शिरावे लागेल. इथे इतके सांगून भागू शकेल की आशय कवीच्या अंतर्मनातून येतो. तिथेच तो अनेक जाणिवांनी, संवेदनांच्या साठवणींनी संपन्न झालेला असतो. त्या आशयातच त्याचे रूप समवायसंबंधाने असते. अंतर्मनात असलेला आशय आणि त्याचे रूप अबोध अवस्थेत असते. प्रकट झालेल्या कवितेतील आशयाची आणि रूपाची बीजे तिथेच असतात. आशयाच्या आणि रूपाच्या प्रकटनक्रियेचा आलेख असा काढता येईल:

| | | | |
|---|---|---|---|
| बहिरंग | सचेतन मन | आशय-अभिव्यक्ती | रूपबंध (बांधणी, बंदीश, घाट) |
| सबाह्यांतरंग | प्रेरित मन | आशय-आविष्कार | रूपाकार, रूपाकृती |
| अंतरंग | अचेतन अबोध मन | आशय (संपन्न) (सबीज) | स्वरूप, निजरूप |

ह्या आलेखात मी आविष्कार आणि अभिव्यक्ती अशा दोन अवस्था दाखविल्या आहेत. हे दोन शब्द सारख्याच अर्थाने वापरले जातात असे पुष्कळ ठिकाणी दिसते, पण त्यांत सूक्ष्म असला तरी भेद मानला पाहिजे. माझ्या मते काव्यनिर्मितिव्यापारात आविष्कार ही अभिव्यक्तीच्या आधीची पूर्वावस्था आहे. इंग्रजीत कंटेंट आणि एक्सप्रेशन (अभिव्यक्ती) ह्यांमधली अवस्था दाखविणारा शब्द काव्यसमीक्षेत प्रचारात असलेला आढळत नाही, पण आविष्कार आणि अभिव्यक्ती ह्यांची भिन्नता सुचविणारा विचार आहे. क्रोचे ह्या सौंदर्यतत्त्वचिंतकाच्या प्रतिपादनाचा इथे उपयोगी असा मला जाणवलेला मथितार्थ हा की "मायकलअँजेलोने कॅन्व्हासवर ब्रशाचा पहिला स्पर्श करण्याआधी त्याच्या मनात अस्तित्वात होती ती त्याची खरी कलाकृती. तिचा उत्स्फूर्त आविष्कार ही शुद्ध चैतन्यात्मक क्रिया. पार्थिव माध्यमातून प्रकट होते ती अभिव्यक्ती."

कविता शब्दांच्या माध्यमातून प्रकट झाली की ती अभिव्यक्ती. अबोध मनातील आशय शब्दांतून बाहेर पडण्याच्या क्षणापूर्वी प्रेरित झालेल्या मनात उत्स्फूर्तपणे जी अचेतन आणि सचेतन मनाची सबाह्यांतरंग खळखळ होत राहते आणि तीतून शब्द फुटतात तो आविष्कार. हा अनुभव मी माझ्या 'साथ' ह्या दशपदीत

हळू हळहळ केव्हा सळसळ कधी असतो नुसताच खेळ
त्यांच्याशीच पुन्हा साधावा लागतो खळखळींच्या कल्लोळांचा मेळ

ह्या चरणांत व्यक्त केलेला आहे. त्याच क्षणी अचेतन मनातील आशयाशी समवायसंबंधाने निगडित असलेले स्वरूप, निजरूपही रूपाकार, रूपाकृती होते आणि निश्चित होत जाते. पुढे अभिव्यक्तीच्या क्रियेत त्या रूपाकाराचा, रूपाकृतीचा रूपबंध होतो. त्याला बांधणी, बंदीश, घाट असेही म्हणता येईल.

•

आता आशय आणि रूप ह्यासंबंधीचे विचार मांडल्यानंतर आधीच्या एका परिच्छेदात अनुत्तरित ठेवलेल्या प्रश्नाकडे

वळता येईल. दशपदीत दहाच चरण का असावेत ह्या प्रश्नाचे उत्तर तिथेच दिले. पण खरा प्रश्न दशपदीतील आशय दहा चरणांत संपूर्ण व्यक्त होणाराच का असावा हा आहे. आशय आणि रूप ह्यांचा समवायसंबंध असतो हे जर मान्य असले तरच माझे उत्तर पटण्याची शक्यता आहे. आशयावर संयोगसंबंधाने कोणतेही रूप चिकटविता येते, त्याला कोणत्याही रूपबंधाच्या साच्यात ठोकठाक करून बसविता येते, किंवा अभिव्यक्ती पूर्ण झाल्यावरही तिच्यात ओळी जोडता येतात, तोडता येतात, काढता-घालता येतात, किंवा रूपबंध असे काही नसतेच, असे ज्यांचे ठाम मत असेल त्यांच्यासाठी माझ्याजवळ काही उत्तर नाही.

दशपदीतील आशयच दहा चरणांतच संपूर्णपणे अभिव्यक्त होईल असाच असतो. सचेतन मनाने प्रेरित मनातील स्फूर्तींच्या चैतन्यक्रियेमुळे तसाच, तितकाच आशय अचेतन, अबोध मनातून ओढलेला असतो. त्याचे स्वरूप, निजरूप, रूपाकार, रूपाकृती आणि रूपबंध तसाच असतो. म्हणूनच तो दहा चरणांत संपूर्णपणे व्यक्त होतो. अचेतन, अबोध मनातले बीजच तसे असते. ज्याचे बीज त्याचे रूप. पळसाला किंवा बेलाला पाने तीनच का आणि अमुक झाडाच्या फुलांना पाकळ्या पाचच का अशा प्रश्नाचे उत्तर आपण देतो की त्याचे बीज आणि जीवाशयच तसा आहे म्हणून. दशपदी ह्या रूपबंधाविषयी माझे उत्तर तसेच आहे.

दहा चरणांची कविता लिहिल्याने दशपदी आणि चौदा चरणांची लिहिल्याने सॉनेट, सुनीत होत नाही. आपाततः तसे झाले असणे शक्य आहे ह्याचा पुनरुच्चार करितो. आपाततः नसेल तर तसा रूपबंध जाणवला पाहिजे, आणि आशय असा असला पाहिजे आणि शब्द इतके अपरिहार्यपणे आले असले पाहिजेत की काही सांगायचे राहिले, अधिक सांगता आले असते, काही उगीच विस्तारिले गेले, असे वाटायला नको. कवीला आणि सहृदय रसिकालाही. शिवाय अभिव्यक्तीच्या संपूर्णतेच्या समाधानाची भावनाही जाणवली पाहिजे. तरच त्या रचनेला यशस्वी दशपदी म्हणता येईल. एरवी नाही.

उर्दूतल्या काही गज़ला दहा चरणांच्या असतात. पण त्यांत पाच स्वयंपूर्ण द्विपदी शेर असतात. एकाला दुसऱ्याची

अपेक्षा असतेच असे नाही. गज़लाच्या दहा चरणांत जर आशयाचा सलग प्रवाह असला तर त्या गज़लाचा रूपबंध दशपदीसारखाच आहे असे मानता येईल. माझ्या काही दशपदी तशा आहेत.

कवितेतील रूपबंध कसा जाणवतो, जाणवून घेता येतो ह्याविषयी पुष्कळ लिहिता येण्यासारखे असले तरी ते थोडक्यात सांगून मी आटोपते घेणार आहे. कवितेत रूपबंधाला फार महत्त्व आहे, कारण ते काव्यसौंदर्याच्या अनेक अंगांमधील एक महत्त्वाचे अंग (इन्ग्रेडियंट) आहे. रूपबंधाची जाणीव अनेक प्रकारची असते. एकीला कायिक जाणीव म्हणता येईल. म्हणजे तिथे बौद्धिक क्रिया नसते. नुसती कानाला गोड लागते, तिची लिखित वा छापील मुद्रा मनात भरते, अशी एखादी कविता असते. हे रूपबंधाचे कायिक अंग. पण ते मानसिक अंगापासून अगदी वेगळे करता येत नाही. ती अंगे एकमेकांत गुंतलेली असतात.

रूपबंधाची दुसरी जाणीव नादावर्तनाची. म्हणजे शब्दांतील नादांच्या संवादाची, विरोधाची, पुनरावृत्तीची, त्यांनी घडलेल्या आकृतिबंधाची, आघात, अनाघात, उदात्त, अनुदात्त उच्चारण आणि आवाजाचा चढउतार इत्यादींतून होणारी.

तिसरी जाणीव तालावर्तनी, म्हणजे अभिव्यक्तीतील आंदोलन, ताल, लय ह्यांतून होणारी. इथे सुयोग्य छंदाश्रयही रूपबंधाची जाणीव उत्पन्न करण्यास साहाय्यक होत असतो.

चौथी जाणीव शब्दध्वन्यात्मक, म्हणजे सहजपणे जुळलेले यमक, अंतर्गत नादसाम्य, यमकाचा योजनाबंध, अनुप्रास, स्वाभाविक ध्वनींचे अनुसरण करणारी शब्दसंहती (ऑनोमोटोपोइया), एखाद्या शब्दाची सलग पुनरुक्ती इत्यादींतून होणारी रूपबंधाच्या अंगाची जाणीव.

वर सांगितलेली रूपबंधाची जाणीव करून देणारी अंगे पुष्कळदा एकामेकांत मिसळून गेलेली असतात. पण ही सर्व रूपबंधाची बाह्यांगे आहेत.

रूपबंधाचे आंतरिक अंग म्हणजे आशयाला संपन्नपणे अभिव्यक्त करणाऱ्या सर्व गोष्टी. रूपबंधाच्या आंतरिक अंगाची

जाणीव बौद्धिक क्रियेने मनाला हो‍ असते. तिथे अभिव्यक्तीतला भावनात्मक युक्तिवाद, जाणिवांचे आनुपूर्व्य, प्रतिमांचा आश्रय आणि उत्तम काव्या‍ जे जे काही असायला पाहिजे ते सारेच येईल.

कवितेतल्या रूपबंधासंबधी इतके शब्दंत सांगण्यासारखे आहे. आणखीही असेल. त्याचे भान मला राहिले नसेल. ते समर्थ कवींनी, समीक्षकांनी आणि तत्त्वचिंतकांनी सांगावे.

रूपबंधासंबंधी शब्दांत सांगता येणार नाही असे शब्दांच्या पलीकडचेही पुष्कळ आहे. त्याची नुसती जाणीव होईल. तीही अतींद्रिय मनाने, आपली आपल्याला. दशपदीचे आणि तिच्या रूपबंधाचे एवढेच, इतकेच, असेच, अपुरेच दर्शन मला झाले आणि ते कसेबसे सांगून‍ झाले.

भाद्रपद शुद्ध पंचमी
शके १८९८, रविवार
२९ ऑगस्ट १९७६

आत्माराम रावजी देशपांडे 'अनिल'

द
श
प
दी
•
•
•
अ
नि
ल

## पद्चर्या

एकोणीसशे एकसष्ट ते एकोणीसशे शहात्तर. पंधरा वर्षांचा दीर्घ कालखंड. या कालखंडात पुष्कळ गोष्टी घडल्या. काही माणसे जवळ आली, काही दूर गेली. काही वेळा वर्तमानाने भविष्याकडे चेहरा वळवला, तर काही वेळा तो तेथेच हटून बसला किंवा भूताच्या दिशेने चालू लागला. काही वेळा वादळे झाली. फार अस्थिर, असुरक्षित वाटले. काही वेळा सगळ्या प्रश्नांची उत्तरेच कोठेतरी हरवून गेली. ती शोधण्याचा प्रयत्न करण्याइतकेही त्राण उरले नाही. मग पराभव निमूटपणे स्वीकारून स्वस्थ बसले. मनाशीच म्हणाले,

हारल्याची हरवल्याची जाणीव सलत राहते
अशा वेळी काळोखात विरून जावे वाटते!

काळोख होताच. पण त्यात विरून जाण्यापूर्वीच कविता मध्ये उभी राहिली. तिने 'विराणी'ऐवजी काही नवे सूर ऐकवायला सुरवात केली. नवे सूर आणि नवे शब्द. ते कोठून आले? कधीतरी ते कवीच्या मनात घुमत होते. नंतर कधीतरी ते ध्वनिमुद्रित झाले होते. ते माझ्यापर्यंत कसे येऊन पोचले? कोण जाणे. ते सजीव झाले होते एवढे खरे. आणि त्यांनी मला सजीव केले होते हेही खरे. "का जगायचे?" या प्रश्नाचे उत्तर मिळाले होते. अशा चांगल्या कवितेसाठी जगायचे. ती वाचत असताना मिळणारा आनंद अनुभवण्यासाठी जगायचे..

कवितेने मला हा आधार वारंवार दिला आहे. विशेषतः अनिलांच्या कवितेने. पूर्वी 'फुलवात' आणि 'पेर्तेन्हा' या संग्रहांमधील काही कवितांची सोबत होती; 'भग्नमूर्ती' आणि 'निर्वासित चिनी मुलास' यांमधील विचार मनाला नवी बैठक देत होते. आजही ते सगळे स्मरणात आहेच. पण आज 'फुलवात'ऐवजी 'सांगाती' उघडावेसे वाटते. त्यातील

'सारेच दीप कसे मंदावले आता' 'तहान', 'आम्ही', 'रंभागर्भ', 'तटस्थ' यांसारख्या ओळखीच्या कवितांवरून एक नजर टाकून शक्य तेवढ्या लवकर एखाद्या दशपदीपर्यंत पोचावेसे वाटते. आणि मग तेथेच थांबावेसे वाटते. प्रत्येक दशपदी कशी बांधीव, अर्थसघन. 'सांगाती'त अशा तेरा दशपद्या आहेत. त्यांपैकी बहुतेक प्रवासात लिहिलेल्या. नंतरच्या पंधरा वर्षांत फक्त सव्वीस दशपद्या लिहिल्या. त्याही प्रवासात. यांतील प्रत्येक दशपदी ही माझी एकेक आठवण आहे. एखादी दशपदी कुसुमावतींच्या हस्ताक्षरात मिळालेली; एखादी अनिलांनी पत्रातून लिहून पाठवलेली; काही प्रसिद्ध होण्यापूर्वीच वाचून, गाऊन दाखवलेल्या काही प्रसिद्ध झाल्यानंतर वाचलेल्या. प्रत्येक दशपदीबद्दल काही ना काही बोलणे झालेले. त्या निमित्ताने इतर कवितांबद्दलही. बोलणे चालू असताना किंवा झाल्यानंतर मनात यायचे, हे सगळे आपल्या स्मरणातून जाण्यापूर्वीच टिपून ठेवले पाहिजे. ते महत्त्वाचे आहे. इतरांनी अनिलांवर पुष्कळ लिहिले असेल. अनिलांनीही काही निमित्तांनी स्वतःच्या कवितेवर लिहिले असेल. पण त्या लेखनात हा मोकळेपणा नाही. एक पवित्रा घेऊन काही गोष्टी सांगितलेल्या आहेत काही सांगितलेल्याच नाहीत. म्हणूनच, अनिल रंगात आल्यावर जे सांगतात ते टिपून ठेवले पाहिजे. 'सांगाती' प्रसिद्ध झाल्यानंतर—म्हणजे या पंधरा वर्षांत—हा विचार अनेक वेळा मनात येऊन गेला. पण प्रत्यक्ष कृती जमली नाही. एक जाणीव मात्र सतत होत राहिली : या पंधरा वर्षांत अनिलांचे आयुष्य किती बदलले आहे! म्हातारे झाले आहेत, थकले आहेत. पण अजून प्रवासाचे वेड कमी झालेले नाही. कुठली-कुठली आडगावे शोधून काढतात. तेथे जाऊन काव्यवाचन करतात, कवितेवर व्याख्याने देतात. तेथे आपल्या कवितेवर कोण काय म्हणतो हे ऐकून घेतात, एखादा प्राध्यापक आपली कविता कशी शिकवतो हे पाहतात, आणि "एकंदरीत सगळे छान चालले आहे" या आनंदात असतात! त्यांच्या आवडत्या ब्राउनिंगच्या भाबड्या 'पिपा'प्रमाणे "All's right with the world! म्हणत. हे वृत्तांत त्यांच्याकडून ऐकत असताना, त्यांच्या किंचित वाकलेल्या, सुरकुतलेल्या शरीराकडे पाहत असताना, लहान तोंडी मोठा घास घेऊन म्हणावेसे वाटते, "आप्पासाहेब, आता हे सगळं थांबवा. थोडी विश्रांती घ्या. या लोकांवर इतके खूष राहू नका. त्यांच्याबद्दल काही तक्रारी करा. कारण तक्रारी कराव्या अशीच

परिस्थिती आहे. स्वतःपासून, इतरांपासून जरा दूर राहिलात तर ती परिस्थिती तुम्हांला दिसेल. जे फक्त तुम्हीच करू शकाल असं राहून गेलेलं लेखन करावंसं वाटेल. आणखीही काही गोष्टी राहून गेल्या आहेत. कुसुमावतींच्या अप्रसिद्ध लेखनाचं संकलन आणि प्रकाशन. तुमच्या लेखांचं आणि रेडिओवरील भाषणांचं संकलन. तुमच्या मनात असलेलं, वासुदेव बळवंत पटवर्धन यांच्या चरित्राचं लेखन. हे तुमच्याशिवाय कोण करणार? तुम्ही इतर गोष्टींत न गुंतता सवड काढा. आम्ही तुम्हांला सगळी मदत करतो. आम्ही दोघं, भागवत, पाडगावकर..." पण हे बोलून दाखविण्याचा धीर होत नाही. कधी धीर होत नाही, आणि कधी त्यांचे बोलणे ऐकत असताना आपल्याला काही बोलायचे होते याचाच विसर पडतो. पण हे बोलणे टिपून ठेवले पाहिजे याचा मात्र विसर पडला नव्हता. अधिकाधिक थकत चाललेल्या अनिलांना पाहून तो विचार अधिकाधिक तीव्र होत होता.

•

आणि दोन वर्षांपूर्वी, सप्टेंबर महिन्याच्या आरंभीच, ती संधी मिळाली. आम्ही डेक्कन क्वीनने पुण्याहून मुंबईला येत होतो. तीन तासांचा प्रवास. अनिलांना कधीच कसली घाई नसते. सगळे कसे संथपणे चाललेले असते. आपली ती जुनीपुराणी बॅग उघडायची. तिच्यातून पानाचा डबा काढायचा. अगदी सावकाशपणे पान लावायचे. हा प्रकार एका तासात निदान दोनतीन वेळा. अनेकदा पाहिलेले हे दृश्य त्या दिवशी पुन्हा एकदा पाहून मी अनपेक्षितपणे सैलावले. ताण नाहीसे झाले. प्रसन्न मनाने बाहेर पाहत असताना "कोवळी सकाळ मनमोकळी" दिसली; "धरातळी रंग एक हिरवा" दिसला. आणि आत, शेजारी? तितकेच मनमोकळे, टवटवीत अनिल. जुन्या आठवणी मनात दाटून आल्या. अनिल प्रथम कधी भेटले, त्यांच्या तोंडून 'चिरयौवन' ही कविता कशी ऐकली, पाठांतरात पक्के असलेले अनिल त्या कवितेतील एक ओळ विसरले तेव्हा मी ती अभावितपणे कशी उच्चारली, अनिल-कुसुमावतींचे सुंदर सहजीवन ग्वाल्हेरला कसे पाहिले, आणि त्यानंतर काही दिवसांनीच कुसुमावती गेल्यानंतर कसे सुन्न होऊन गेले...त्यानंतर काही महिन्यांनी आप्पासाहेब भेटले तेव्हा ते कसे कोळपून गेले होते...मनात आठवणी अशा गर्दी करू लागल्यावर

मला दुसरे काही दिसेना, जाणवेना. फक्त शेजारी सावकाशपणे पान लावत बसलेले अनिल. वाटले, या तीन तासांत अनिलांशी बोलावे, खूप ऐकावे आणि त्यातील जमेल तेवढे कागदावर टिपून ठेवावे. अनिलांचे लक्ष वेधावे म्हणून मी हळूच म्हटले, "आप्पासाहेब..."

"हं..."

"तुमच्या कविता ऐकाव्या, तुमचं त्यांच्यासंबंधीचं बोलणं पुन्हा एकदा ऐकावं असं वाटतं आहे."

"बोलू ना."

हेच उत्तर मला अपेक्षित होते कारण अनिलांना कंटाळा कसा तो ठाऊकच नाही. सदैव उत्साही, बोलके. आज त्यांच्या त्या उत्साहाने मलाही झपाटले होते. पुष्कळ विचारावेसे वाटत होते. जसे सुचेल तसे. एक कान अनिलांकडे होता आणि दुसरा स्वतःच्या मनाकडे. कारण ते मनही बोलू लागले होते. ते म्हणत होते, बाहेर बोलणे चालू आहे आप्पासाहेबांशी...पण आत आहे अनिलांची कविता. अनिल. 'अनिल' का? पूर्वी कधीतरी सांगितले आहे. आज पुन्हा विचारू. तिथेच सुरवात करू.

"तुम्ही 'अनिल' हे टोपणनाव का घेतलंत?"

"रेव्हरंड टिळकांच्या कोणत्यतरी कवितेत—आता त्या कवितेचं नाव आठवत नाही—'जसा अनिल फुलवितो मंद कुसुमाप्रती' अशी एक ओळ होती. त्यातून हे नाव मनात ठसलं. बाणभट्टानंही कुठंतरी 'कुसुमानिल' असा शब्द वापरला आहे."

भाबडेपणाचा आव आणून अनिलांना विचारावेसे वाटले, "कोणतं नाव ठसलं म्हणालात? अनिल—की कुसुम?" पण हे विचारण्याची गरजच व्हती. अनिलांनी पूर्वी याबद्दल पुष्कळ सांगितले होते. 'फुलवात'मधील काही कविता कुसुमावतींना लिहिलेल्या पत्रांत होत्या; काही पु० य० आणि विमलाबाई देशपांडे यांच्यामार्फत कुसुमावतींकडे पोचत

द
श
प
दी
•
•
•
अ
नि
ल

होत्या. त्या सगळ्याच कविता "प्रीतीच्या पहिल्या स्पर्शाने" खुलल्या होत्या. "प्रियेस प्रेम होत मी, अजून यौवनांत मी" हे अक्षरशः खरे होते. पण "विशी तिशी नि चाळिशी"ही उलटल्यावरदेखील ते खरेच राहिले. तसे म्हटले तर अनिलांचे अनुभवक्षेत्र किती व्यापक. प्रेम आणि निसर्ग ही या अनुभवक्षेत्राची केंद्रे. पण चित्रकला, मूर्तिकला, संगीत यांच्यावरील प्रेमामुळे आणि त्यांच्या त्या विषयांतील ज्ञानामुळे 'भग्नमूर्ती'सारखे दीर्घ काव्य आले; प्रेमकवितेला व निसर्गकवितेलाही वेगळे रूपरंग लाभले. सामाजिक व राजकीय जाणीव अत्यंत तीव्र. त्यातून 'निर्वासित चिनी मुलास'-सारख्या दीर्घ कविता व इतर काही स्फुट कविता आल्या. "मला इथेच सत्य तें दिसे पटे क्षणोक्षणीं" हे खरेच. पण तरीही अलौकिकाची, मूर्ताकडून अमूर्ताकडे जाण्याची आस राहिली. यालाच त्यांनी 'प्रतीतिधर्म' असे 'फुलवात'च्या प्रस्तावनेत म्हटले आहे. पण अशा वेगवेगळ्या अनुभवांना स्पर्श करूनही 'प्रेम' हे त्यांच्या भावजीवनाचे केंद्र कधी बदलले नाही. 'प्रेम आणि जीवन' ही दीर्घकविता लिहिण्याआधी अनिल अस्वस्थ होते. त्यांनी कुसुमावतींना सांगितले होते, "मला डिस्टर्ब करू नको. मी एकाग्रपणे, काहीतरी फार चांगलं लिहिणार आहे..." कविता पूर्ण होईपर्यंत कुसुमावतींनी व्यत्यय आणला नाही. व्यत्यय आणणे हे त्यांच्या स्वभावातच नव्हते. नेहमी तटस्थ राहत. अनिल एकसारखे प्रवासात असत. प्रवासात कविता लिहीत. प्रवासाहून परतल्यावर कुसुमावतींचा पहिला उत्सुक प्रश्न "आहे का काही?" हा असे. आणि त्याला अनिलांचे उत्तर "आहे. एक मासा सापडला आहे!" हे. मग प्रवासातील कपडे बदलण्यापूर्वीच, चहा घेण्यापूर्वीच ती कविता वाचून दाखवायची. इतके औत्सुक्य. कोणत्याही कवितेचा पहिला श्रोता कुसुमावतीच. पण कविता ऐकल्यावर त्यांनी सहसा भाष्ये केली नाहीत, बदल सुचवले नाहीत. "ही कविता वेगळी वाटते" यासारखे एखादे सूचक वाक्य त्या बोलल्या. क्वचित एखादी सूचनाही केली. 'श्रावणझड' या कवितेबद्दल अनिलांनी सांगितलेली एक गोष्ट आठवते. निवांत दुपार. घरात अनिल व कुसुमावती दोघेच. बाहेर पाऊस. अनिलांच्या तोंडून सहज एक ओळ आली : "श्रावणझड बाहेरी मी अंतरि भिजलेला". कुसुमावतींनी ही ओळ ऐकल्यावर त्या म्हणाल्या, "या कवितेशी दंगामस्ती करू नका. सावकाश लिहा." तशीच 'लावण्य' या कवितेबद्दलची एक आठवण. त्या

कवितेच्या पहिल्या दोन ओळी अशा आहेत :

असे काहीतरी आगळे लावण्य केव्हा कधीकाळी दिसून जाते
वेगळा सौंदर्य-पर्युत्सुक जीवा जन्मांतरीचे सांगत नाते

आधी 'जन्मांतरीचे' ऐवजी 'जननांतरीचे' हा शब्द होता. (याला अनिल 'श्रुतयोजना' म्हणतात.) पण कुसुमावतींना वाटले, हा शब्द वाचून कालिदासाची आठवण आता होणार नाही. म्हणून त्यांनी 'जन्मांतरीचे' हा शब्द सुचवला आणि अनिलांनी तो स्वीकारला. अशीच आणखी एक आठवण : 'जुई' या कवितेतील

मादकता जाते मार्दवी विरून सौंदर्य सोज्वळाआड दडते
सोलीव सुखाचे स्वप्नच एक जीवाला जागतेपणी पडते!

या शेवटच्या ओळी ऐकून कुसुमावती म्हणाल्या, "या तुमच्या ओळी वाटत नाहीत... !" पण त्यांनी त्या वेळी कोणताही बदल सुचवला नाही. ही कविता लिहिल्यानंतर काही दिवसांनी अनिल व कुसुमावती एका बंगाली मुलीच्या लग्नाला गेले. मुलगी सुंदर दिसत होती. घरी आल्यावर त्या चेहऱ्याच्या आठवणीने कुसुमावतींच्या डोळ्यांत पाणी तरारले. त्या म्हणाल्या, "इतकी सुंदर मुलगी होती! मी कधी तिचा चेहरा विसरणार नाही. सौंदर्याला सोज्वळाचं आवरण कसं असू शकतं हे आज कळलं...तुमच्या ओळी कळल्या!" 'लावण्य'मधील

नसते निव्वळ गात्रांची चारुता त्याहून अधिक असते काही

ही ओळ वाचून तर त्या शहारल्याच. ज्याची प्रतीती येते पण ठाव लागत नाही, जे मुक्त आहे, अशा लावण्याची कुसुमावतींना तहान होती. ते त्यांनी अनिलांच्या कवितेत पाहिले; इतरत्र स्वतःच्या आणि अनिलांच्या डोळ्यांनी पाहिले.

इतक्या त्या अनिलांशी आणि त्यांच्या कवितेशी समरस झाल्या. 'एकाकी' ही कविता त्यांना इतकी आवडली की त्यांनी ती अनेकांना प्रसिद्ध होण्यापूर्वीच वाचून दाखवली. या कवितेबद्दलची माझी एक आठवण आहे. कुसुमावतींनी ती वाचून दाखवल्यानंतर, पुन्हा एकदा वाचण्यासाठी मी तो कागद त्यांच्याकडून घेतला. कागदावरील कविता कुसुमावतींच्या हस्ताक्षरात होती! कविता वाचून कागद परत कुसुमावतींकडे दिला. त्या थोड्या आश्चर्याने, थोड्या दुखावलेल्या स्वरात म्हणाल्या, "नको?" हे शक्य तरी होते का? पण कदाचित त्यांना ती हवी असेल, दुसरी प्रत नसेल, म्हणून मी तो कागद परत केला होता. कुसुमावतींचा प्रश्न ऐकल्यानंतर मी "खरंच ठेवू?" असे म्हणत तो कागद अधीरपणे ताब्यात घेतला! त्यांचे अनिलांच्या कवितेवर इतके प्रेम. पण त्या कवितेवर त्यांनी काही लिहिले नाही. एकदा त्या अनिलांना म्हणाल्या, "तुमच्या कवितेवर मी कधी लिहू शकणार नाही, कारण ती मला माझीच वाटते!"—असे हे एकरूपत्व. कुसुमानिल...

•

मी भानावर येऊन विचारले, "म्हणून तुमच्या अन् कुसुमावतीबाईच्या पत्रसंग्रहाला तुम्ही 'कुसुमानिल' हे नाव दिलं ना?"

"हो."

"चांगली पत्रं आहेत ती...पण ती प्रसिद्ध करावीत की नाही याबाबत तुम्ही जरा साशंक होता ते का?"

"कारण पत्रं खाजगी असतात. त्यांत इतर व्यक्तींचे उल्लेखही येतात. त्यांतील काही व्यक्ती अजून आहेत. त्यांना ते रुचेल न रुचेल. शिवाय, मला तुम्ही 'अनिल' म्हणून पाहिलेलं. त्या पत्रांत आहे तो आ० रा० देशपांडे...कुसुमचा आप्पा..."

पुन्हा अनिल त्याच बिंदूपाशी येऊन पोचले होते. मीही. माझ्या मनात आले, अशी अणखी पुष्कळ पत्रे असतील. 'कुसुमानिल'चा दुसरा भाग का निघू नये? सहज निघेल. मग अनिल स्वस्थ का आहेत? ती पत्रे प्रसिद्ध करण्याच्या

दृष्टीने पुन्हा एकदा शांतपणे वाचणे त्यांना अशक्य तर होत नसेल? तसेच असणार. ते कधी बोलून दाखवत नाहीत. पण ते मनातून खचले आहेत. एकटे झाले आहेत. कुसुमावतींच्या मृत्यूनंतर लिहिलेल्या कितीतरी कवितांतून हे एकाकीपणाचे सूर उमटले आहेत. 'अदृष्ट', 'नाटक', 'तदात्मता' या कवितांबद्दल त्यांच्याशी बोलले पाहिजे. पण कुसुमावती असताना 'एकाकी' ही कविता लिहिली, ती का?

"आप्पासाहेब, 'एकाकी' अक्कांच्या मृत्यूपूर्वी काही दिवस लिहिली ना?"

"हो. प्रवासात होतो. खूप पाऊस पडत होता त्या दिवशी. मन उदास होते. किशोरच्या आठवणी मनात होत्या. बाहेर पाहत होतो, अन् एकाएकी, कशी कोण जाणे, समोरच्या वर्तुळाकार ढगात कुसुमची आकृती दिसली... स्वप्नातल्या मुक्या सावलीसारखी...मग ही कविता लिहिली. नेहमीप्रमाणं परत आल्यावर कुसुमला ती वाचून दाखविली. ती रडू लागली. म्हणाली, 'ही कविता का लिहिलीत?' मग तिची समजूत काढण्यासाठी काहीतरी सांगावं लागलं. सांगितलं, 'प्रवासाला निघाले त्याआधी आतल्या खोलीत जाऊन कपाट उघडलं. त्या कपाटात किशोरचे कपडे दिसले... ते कपडे घातलेला तो दिसू लागला. इतका जवळ, इतका दूर. इतका खरा, इतका भासासारखा...स्वप्नातल्या मुक्या सावलीसारखा. हे मनात घोळत होतं. त्यामुळं ही कविता सुचली असावी.' यावर ती म्हणाली, 'या कवितेत काहीतरी सूचना आहे...किशोर नसला तरी आपण दोघे आहोत. तरी तुम्ही स्वतःला एकाकी का म्हटलंत? तुमच्या कवितांत काही प्रॉफेटिक असतं!' यावर मात्र मला काही उत्तर देता येईना!"

काही वेळा असे घडते खरे. ग्वाल्हेरच्या साहित्यसंमेलनातील शेवटची संध्याकाळ आठवते. आम्ही काही मंडळी एका दूरच्या, शांत हॉटेलात जमलो होतो. खाणेपिणे चालले होते. अनिल आनंदात होते. त्या पार्टीचे यजमान या नात्याने आम्हांला आग्रह करत होते. काही वेळानंतर आम्ही सुचवले म्हणून ते कविता म्हणू लागले. त्यांतील एक कविता 'तहान' ही होती. अनिलांना पाठ. आमच्यापैकी काहींना पाठ. पण का कोण जाणे, "कपालाकाशांत शांत घंटानाद" या ओळीनंतर अनिल थांबले. त्यांना पुढील ओळ चटकन आठवेना. आम्हांलाही आठवेना. इतका

वेळ शांतपणे कविता ऐकत बसलेल्या कुसुमावती हळूच पुढची ओळ म्हणून गेल्या "निर्याणगीताच्या शिंगाची साद". पुढे तीन आठवड्यांनीच त्या गेल्या! या प्रसंगातही कुसुमावती म्हणाल्या तशीच एखादी सूचना दडलेली होती का? माझ्या मनात हा प्रश्न. अनिल मात्र वैयक्तिक संदर्भ विसरून 'कविता' म्हणून विचार करत होते :

"या कवितेत एक ओळ आहे : 'आधारच तुझ्या पायाखालचा निघून गेला कसा एकाएकी'. या ठिकाणी मी 'तुझा पायाखालचा असं का म्हटलं नाही? कारण मग 'ती' माझ्या पायाखालच्या आधारासारखी असं वाटलं असतं. म्हणून 'तुझ्या'. हा शब्दही सहजसत्यासारखा आला होता. तुझ्या पायाखालचा आधार निघून गेला. हा आधार म्हणजे जीवन. किशोर नसला तरी आम्ही दोघे होतो, तरीही 'एकाकी' वाटलं खरं. कुसुम म्हणाली तशी काहीतरी 'सूचना' मिळाली खरी..."

अनिल कवितेतील शब्दांबद्दल इतका सूक्ष्मपणे विचार करतात का? आणि तोही कवितेचे लेखन चालू असताना? त्याबद्दलही त्यांना विचारायचेच आहे. पण अजून मन कुसुमावतींच्या स्मृतींतून बाहेर निघायला तयार नव्हते. आता अनिल आपल्या नव्या कविता कोणाला वाचून दाखवत असतील? कधीकधी जवळच्या स्नेहीमंडळींना. पण हे नेहमीच शक्य होत असेल? आणि त्यामुळे कुसुमावतींची उणीव भरून निघत असेल?

मी काही विचारण्यापूर्वीच अनिल म्हणाले, "माझी नवी कविता मी कुसुमला वाचून दाखवत असे. आता कोणाला दाखवू? मग स्वतःशीच म्हणत बसतो. एक आहे मात्र. आमच्या उल्हासनं माझ्या सगळ्या कविता टेप करून ठेवल्या आहेत..."

हे ऐकून मला फार बरे वाटले. अनिलांच्या कविता अनिलांच्याच आवाजात ऐकल्या पाहिजेत. त्यांची एक खास वाचनशैली आहे. मुक्तछंदही ते विशिष्ट ढंगात वाचतात आणि तो तसाच वाचला पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे. 'प्रेम आणि जीवन'मध्ये अनिलांचे विशिष्ट प्रेमविषयक तत्त्वज्ञान आहेच. ते त्यांच्या आधीच्या आणि नंतरच्याही

अनेक कवितांचे अधिष्ठान. शिवाय ती त्यांची मुक्तछंदातील पहिली कविता.
"आप्पासाहेब, तुम्हांला मुक्तछंद कसा सुचला?"
"याला कारण वासुदेव बळवंत पटवर्धनांचे संस्कार!"
अनिलांवर केशवसुत, ब्राउनिंग यांचे संस्कार आहेत. संस्कृत व उर्दू काव्यही त्यांनी उत्तम वाचले आहे. शिवाय संतांची कविता. शेक्सपिअर, रुपर्ट ब्रूक हे त्यांना प्रभावित करणारे आणखी काही कवी. 'एका पिढीचे आत्मकथन' या पुस्तकातील लेखात त्यांनी आपल्यावर झालेल्या या विविध संस्कारांचा उल्लेख केला आहे.
"म्हणजे 'काव्य आणि काव्योदय'चे लेखक?"
"हो. ते आम्हांला फर्ग्युसन कॉलेजात प्रोफेसर होते. ब्राउनिंग काय सुंदर शिकवायचे! मला ब्राउनिंग आवडू लागला, त्याचा माझ्या कवितेवर थोडा परिणाम झाला, तो त्यांच्यामुळंच! फार छान वाचत. एकदा त्यांनी वॉल्ट व्हिटमनची 'ओ कॅप्टन' ही अॅब्राहम लिंकनच्या खुनानंतर लिहिलेली कविता वाचली. ही कविता मुक्तछंदात होती. ती ऐकून मी प्रभावित झालो. वाटलं, आपणही असंच काहीतरी लिहावं."
"पण त्याआधी मनात यासंबंधी काहीतरी विचार चालू असतीलच की."
"होते ना. वाटायचं, कोणत्या तरी छंदाला मोकळं केलं पाहिजे. त्या वेळी विबुधप्रिया ह्या वृत्तातलं तालावर्तन मनात घोळत असावं. म्हटलं, तेच मोकळं करण्याचा प्रयत्न करू. त्यातून 'प्रतिभा' हे काव्य आलं...विचार केला तेव्हा ध्यानात आलं, वृत्तातून जाती आणि जातीतून विबुधप्रिया मुक्त झाली होती. दोन, पाच आणि सात चरणक असलेल्या या मात्रिक मुक्तछंदाला 'प्रतिभा' हेच नाव दिलं. प्रतिभेचा उद्गम कसा होतो, या विषयावरील हे काव्य होतं..."
"प्रसिद्ध केलं नाही?"
"नाही. हजारएक ओळी लिहून अर्धवटच सोडून दिलं."
"फाडलं नाही ना?"

"नाही. असेल कोठेतरी पडून. पण शाळेत असताना लिहिलेल्या कविता मात्र फाडल्या!"

"हा मुक्तछंद लिहिण्याचा पहिला प्रयत्न..."

"हो. पण फसलेला! मग ती पेरिना-चमनची घटना घडली. फार अस्वस्थ झालो. त्या वेळी रामटेकला कोर्टात होतो. दिवसा खूप काम असायचं. रात्री कविता मनात घडत होती. सारखी मनात ती घटना घोळतच असायची. पुन्हा दिवसा काम. हे सगळं वेगळ्या रूपात सांगावं असं वाटायचं. कुठल्याही वृत्तात तो आवेग, आवेश येणार नाही असं वाटायचं. पण वाट सापडत नव्हती. मग तसाच झोपलो. अन् एक चमत्कार घडला. स्वप्नात भराभर ओळी सुचू लागल्या. एकामागून एक पंधरा ओळी—मुक्तछंदात! मग उठलो. दिवा लावला. कुसुमला सांगितलं, 'मला डिस्टर्ब करू नको.' त्या ओळी लिहून काढल्या. दिवसा कामांमुळे खंड पडलाच. पण तरीही मनात जणू सगळं तयार होतं आणि मध्यरात्र उलटून गेल्यावर कविता पूर्ण झाली."

"हा 'प्रेमजीवन' मुक्तछंद."

"हो. पाच आणि सहा अक्षरांचे चरणक असलेला. नंतर दोन आणि तीन अक्षरी चरणकांचा 'मानवता' मुक्तछंद लिहिला."

"'मानवता' याच कवितेत...मुक्तछंदाबद्दल अजून पुष्कळ विचारायचं आहे, आप्पासाहेब. पण त्याआधी 'मानवता' या कवितेबद्दलच थोडं बोलायचं आहे."

"काय?"

"तुम्हांला मानवतावादी कवी म्हटलं जाऊ लागलं ते या कवितेनंतरच. अशाच आणखी काही कविता तुम्ही नंतर लिहिल्या. सामाजिक जाणिवेच्या. पण काहींना त्या खोट्या वाटल्या. त्यांच्या मनात तुमची जी प्रतिमा होती ती एका भावकवीची."

"मी भावकवी आहेच. पण म्हणून मी सामाजिक जाणिवेची कविता लिहू नये की काय? त्या कालखंडात मी दोन्ही

प्रकारची कविता समांतरपणे लिहीत होतो. स्फुट कविता लिहीत होतो, तशी दीर्घ कविताही लिहीत होतो. तिच्यातही मी भावकवी होतोच. यात काही द्वंद्व, विसंगती आहे असं मला वाटत नाही."

•

अनिल किंचित रागावून बोलत होते. खरे म्हणजे ते फार क्वचित रागावतात, तक्रारी करतात. कारण तक्रारी करण्याजोगे काही नाहीच. अजूनही त्यांना कविता सुचते; अजूनही त्यांची कविता वाचकांना आवडते. तरुण मंडळी त्यांच्या अवतीभवती असतात. त्यांना उदंड प्रेम देतात. पन्नासएक वर्षे वाचकांच्या डोळ्यांपुढे इतक्या सातत्याने राहिलेला दुसरा कवी मी पाहिलेला नाही. त्यांच्याकडे पाहताना मला नेहमी रॉबर्ट फ्रॉस्टची आठवण होते—केवळ 'The road not taken' आणि 'दोन वाटा' या कवितांत साधर्म्य आहे म्हणून नव्हे. अनिलांनीही रॉबर्ट फ्रॉस्टप्रमाणेच 'ठसे नसलेली' वाट स्वीकारली. फ्रॉस्टच्याच शब्दांत, "And that has made all the difference!" हे वेगळेपण वाचकांनाही जाणवले हे विशेष. पण तरीही अशा काही ठराविक तक्रारी, भाष्ये ऐकली की ते रागावतात. मग त्यांच्या तक्रारी चालू होतात : "तुम्हा लोकांना प्रेम म्हणजे काय हेच कळत नाही." रविकिरण मंडळाच्या कवींबद्दल ही तक्रार विशेष जोरदारपणे होते. रविकिरण मंडळाच्या काळात अनिल पुण्यात असूनही—इतकेच नव्हे तर मंडळातील कवींना त्यांनी आपल्यात यावे असे वाटत होते तरीही—ते त्या मंडळात गेले नाहीत. याचे कारण संवाद जुळला नसवा हेच. त्यांची आणखी एक तक्रार : तुम्हा लोकांना कवितेतील 'प्रतीयमान अर्थ' कळत नाही. प्रतीयमान अर्थ म्हणजे कवितेतून सूचित होणारा अर्थ. 'श्रावणझड', 'उशिराचा पाऊस' इत्यादी कवितांत तो आहे. 'श्रावणझड'मध्ये एका निर्मितिपूर्व, आत्ममग्न मनोवस्थेचे चित्रण आहे. 'उशिराचा पाऊस'मध्ये उशिरा अनुभवाला आलेल्या प्रेमाचा उदार स्वीकार आहे. एकदा अनिल म्हणाले, "हे कळलं नाही तर काय उपयोग?" मग ते समजावून सांगणे आलेच. अनिल तेही करतात. अशा वेळी मध्येच कोणीतरी अडवणारा प्रश्न विचारला तर त्यांना ते आवडत नाही. पण हे सगळे तात्पुरते. नंतर सगळे विसरून जातात. नंतर पुन्हा आनंदात, समाधानात. म्हणूनच वाटते, फ्रॉस्टप्रमाणे अनिलही

म्हणतील, "I had a lover's quarrel with the world!"
"आणखी एक लक्षात घ्या. या सामाजिक जाणिवेच्या कविता फक्त एका विशिष्ट काळालाच लागू पडतात असं नाही. उदाहरणार्थ, 'सारेच दीप कसे मंदावले आता' ही कविता.

सारेच दीप कसे मंदावले आता
ज्योती विझू विझू झाल्या
की झड घालून प्राण द्यावा पतंगाने
असें कुठेच तेज नाही!
थिजले कसे आवाज सारे?
खडबडून करील पडसाद जागे
अशी कुणाची साद नाही?

ही कविता कोणत्याही काळाला लागू पडेल अशी नाही?"
"निश्चितच आहे. या कवितांत प्रक्षोभरस आहे असं तुम्ही मानता ना?"
"हो. या प्रक्षोभरसाचं मी संस्कृतात निरूपणही केलं आहे. त्याबद्दल नंतर सांगतोच. पण आक्षेपही कसे मजेदार असतात पाहा. मुक्तछंद लिहिला त्या काळीं कोण गहजब! अनेक वाद घालावे लागले, व्याख्यानं द्यावी लागली. १९३६ साली जळगाव साहित्य संमेलनाला गेलो होतो. माधव जूलियन अध्यक्ष होते. त्या वेळीं तर हा वाद ऐन भरात होता. कोणीतरी म्हणालं, 'या मुक्तछंदात वैविध्य नाही. फक्त दोन चरणक.' याला अत्र्यांनी फार चांगलं उत्तर दिलं. ते म्हणाले, 'माणसाला दोनच पाय असतात. पण त्या दोन पायांनी तो विविध चाली चालू शकतो!' चांगली तीनचार

तास चर्चा रंगली त्या वेळी मुक्तछंदावर. आणि मी मुक्तछंद लिहिला याचा अर्थ माझा सयमक, छंदोबद्ध कवितेला विरोध आहे असा थोडाच होतो? माझ्या दशपदीच पाहा. त्यांत यमकं आहेत, यमकांचे वेगवेगळे प्रकार आहेत..."

"प्रक्षोभरसाबद्दल काय सांगत होता?"

"त्या वेळीही हाच वाद. कोणी म्हणालं, प्रक्षोभ हा रस मानायचा तर आळस हा रस का मानू नये? पुढं कोणी रसव्यवस्थेला 'अडगळ' म्हटलं. मुळीच नाही. आता असं पाहा : सर्व रसांचा प्रशम म्हणजे शांतरस. आणि सर्व रसांचा प्रकर्ष म्हणजे प्रक्षोभरस. म्हणजे प्रक्षोभ हा शांतरसाचा प्रतिद्वंद्वी आहे. आवेग हा त्याचा स्थायिभाव. का, ते सांगतो. स्थायिभाव आठ आणि संचारी भाव तेहतीस. निर्वेद हा संचारी भावांच्या यादीतील पहिला. तो शांतरसाचा स्थायिभाव. आता निर्वेद गेल्यानंतर 'आवेग' हा दुसरा संचारी भाव पहिला होतो. म्हणून मी 'देहलीदीपन्याया'नं तो प्रक्षोभाचा स्थायी म्हणून निवडला. आणि ते परंपरेला धरून होतं."

'देहलीदीपन्याय' हा शब्द तर मी अनिलांच्या तोंडून अनेक वेळा ऐकला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्या कवितेतील काही शब्द उंबरठ्यावरील दिव्यासारखे त्यांच्या आधीच्या व नंतरच्या शब्दांवर प्रकाश टाकतात. त्यांना अधिक अर्थसंपन्न करतात. शिवाय, त्यांच्या कवितेतली ओळ कुठूनही सुरू करून कुठेही यती घेऊन म्हणता येते आणि अर्थाच्या एकेका वेगळ्या छटेला उठाव देता येतो. 'विराणी'तील एका ओळीचे त्यांनी दिलेले उदाहरण आठवते : 'आभाळ खाली वाकलेले', 'खाली वाकलेले मेघ', 'वाकलेले मेघ काळे', 'मेघ काळे क्रूर'. म्हणूनच दशपदीत विरामचिन्हे नसावीत असे त्यांचे म्हणणे आहे.

"प्रक्षोभ हा रस मानलाच पाहिजे. अलिकडचं दलित काव्य पाहा. त्यांत प्रक्षोभरस ओतप्रोत भरलेला आहे."

हे ऐकत असताना माझ्या मनात अनेक दिवस असलेला प्रश्न विचारण्याचा मला मोह झाला : "आप्पासाहेब, तुम्हांला कोणाकोणाची कविता आवडते?" केशवसुतांचा उल्लेख ते वारंवार प्रेमादराने करत असतात. इतर एकदोन कवींचाही. पण मला आवडणारे काही कवी त्यांना आवडत नाहीत आणि मला अनेक कारणांसाठी दुबळी वाटणारी

कविता ते नावाजत असतात, तेव्हा फार नवल वाटते. पण चर्चा करण्यात अर्थ नसतो. अखेर कवितेविषयीच्या आवडी-निवडी हा एक फारच वैयक्तिक भाग असतो, नाही का?

"आणि हे दलित काव्य माझ्या मते 'मानवता' मुक्तछंदातच आहे."

"आज लिहिल्या जाणाऱ्या मुक्तछंदाबद्दल तुमचं काय मत आहे?"

"त्यातले काही मुक्तछंद नाहीतच. एका ओळीचे अनेक तुकडे करून छापले की लगेच काही तो मुक्तछंद होत नाही. तो असतो मुक्तछंदाचा फक्त आभास. तो खरा बद्धछंदच! पुष्कळ वेळा तालाची जाणीव नसते. असतो फक्त मोकाटपणा! एक्सप्रेशन हॅज बिकम ईझि!"

यासंबंधीही अनिलांचे काही निश्चित विचार आहेत. आशय व विषय यांत ते फरक करतात. आशय हा कवीच्या मनात संपन्न होतो. रूप हे आशयाशी निगडित असते. म्हणून आशय व रूप यांच्यातील संबंध हा 'समवायसंबंध'. आपण तांब्याला कल्हई लावतो. पण कल्हई हे तांब्याचे रूप नव्हे. म्हणून तो 'संयोगसंबंध'. आशय सुप्त मनात बीजरूपानं असतो. त्याचा प्रकट मनात प्रवेश होणे ही आविष्काराची अवस्था. येथे जे implicit असते ते explicit होते. आणि प्रत्यक्ष लेखन ही अभिव्यक्ती.

बिअरचा पेला समोर ठेवून अनिल अशा अवघड विषयांवर सहजपणे बोलत असतात! इतक्या सहजपणे की अनिल आणि बिअर यांच्यात काही 'समवायसंबंध' आहे असे वाटावे!

अशीच आणखी एका बैठकीची आठवण आहे. 'अजुनी रुसून आहे' या अनिलांच्या कुमार गंधर्वांनी गायिलेल्या कवितेची ध्वनिमुद्रिका नुकतीच तयार झाली होती. अनिल घरी आले. जेवणाची वेळ झाली होती. पण "आधी ती ध्वनिमुद्रिका घेऊन या. ती ऐकू, बिअर पिऊ व नंतर जेवू—" असा त्यांचा आग्रह होता! जेवायला चार वाजले. पण ती दुपार अशी विलक्षण रंगली!

"आप्पासाहेब, आत्तापर्यंत तुमच्या पुष्कळ कवितांच्या ध्वनिमुद्रिका निघाल्या, नाही का?"

"हो. जी० एन० जोशी, गजानन वाटवे हे अगदी सुरवातीच्या काळातील गायक. त्यांनी 'फुलवाती'तील कविता म्हटल्या. नंतर पी० एल०. त्यानं म्हटलेल्या दोन्ही कविता 'पेर्तेव्हा'त आहेत. 'बाई या पावसानं' आणि 'उघड दार'. भीलकंसातील चाल आहे."

"पण तुम्ही ही कविता वेगळ्या तऱ्हेनं म्हणता..."

"हो. कारण ती कविता एखाद्या स्पॅनिश सेरिनेडसारखी आहे. तो एक प्रणयाराधनाचा प्रकार आहे. प्रियकरानं प्रेयसीच्या खिडकीपाशी जायचं आणि गिताराच्या साथीवर गीत म्हणायचं. तिची संमती असली तर ती फुलं टाकते, नाहीतर पाणी! आता हे सगळं फक्त तिला ऐकू गेलं पाहिजे. 'उघड उघड उघड दार, प्रियकरास आपल्या' असं अगदी हलक्या आवाजात म्हटलं पाहिजे. आवाज जरा मोठा झाला तर तिचा बाप जागा व्हायचा!"

"अलिकडच्या ध्वनिमुद्रिका..."

"उषा मंगेशकरनं म्हटलेली 'वेळ झाली भर माध्यान्ह' आणि 'केळीचे सुकले बाग'. कुमारची रेकॉर्ड तर इतकी खपली! आणि गेल्या वर्षी निघालेली वसंतराव देशपांड्यांची गझलांची रेकॉर्ड. यशवंत देवांच्या चाली आहेत. फारच सुरेख!"

अनिलांची लोकप्रियता त्यांच्या ध्वनिमुद्रिकांमुळे वाढली हे खरेच. पण त्या कविता गायल्या जाव्या म्हणून लिहिलेल्या नव्हत्या. त्यांच्यात एक अंतर्गत संगीत होते. ते या कल्पक दिग्दर्शकांनी व गायकांनी पकडले. सगळाच मेळ जमून आला. त्यामुळे खप वाढला. पण मला अभिमान वाटतो तो अनिलांच्या त्या कवितांचा; त्यांच्या ध्वनिमुद्रिका खपतात याचा नाही—आणि त्यांचे संग्रह वेगवेगळ्या विद्यापीठांतून लागतात याचाही नाही! हे घडले याचा आनंद आहेच. पण घडले नसते तरी कुठे फारसे बिघडले असते? अनिलही हा आनंद वारंवार व्यक्त करीत असले तरी त्यांनादेखील खरा अभिमान त्यांच्या कवितेचाच असणार; आणि तो रास्तच आहे.

द
श
प
दी
•
•
•
अ
नि
ल

"'वाटेवर काटे वेचीत चाललो...' मलाही फार आवडतो तो गझल. तुमचा एक नवा प्रयोग."
"प्रयोग, पण 'केलेला' नाही."

•

मी तसे म्हटलेच नव्हते. कारण कोणी 'प्रयोग केला' असे म्हटले की अनिल किती रागावतात हे मला ठाऊक होते. जे सहज स्फुरलेले असते ते हटातटाने रचलेले आहे असे म्हटले तर ते कोणत्या खऱ्या प्रयोगशील कवीला मानवेल?
"'गझल' ही दशपदीच?"
"ते सांगण्याआधी दशपदी म्हणजे काय हे पाहिलं पाहिजे..."
"सांगा."
"दशपदीची पूर्वपीठिका अशी : द्विपदीपासून आपण जयदेवाच्या अष्टपदीपर्यंत आलो. दशपदी हा त्याच्या पुढील स्वाभाविक टप्पा आहे. कोणीतरी मला विचारले, दहा ओळीच का? आता याला काय उत्तर देणार? फर्नची पानं काटेरी का? आहे उत्तर? त्यापैकीच हे. दशपदीची बीजं तुम्हांला माझ्या 'सांगाती'तील काही कवितांत आढळतील. 'तटस्थ'हीच कविता घ्या. 'अंधारी रात्र, सागरकिनारा...' तिच्या बारा ओळी आहेत. पण ही पहिली ओळ पुन्हा आलेली. म्हणून अकराच ओळीं. म्हणून ही दशपदी नव्हे. नंतर 'आश्विन' ही कविता. बारा ओळीं. ओळींची संख्या सोडा. हा दशपदीचा पॅटर्नच नाही. कारण प्रत्येक कडवं स्वतंत्र आहे. दशपदी हे एकसंध युनिट असतं. त्या दृष्टीनं माझी पहिली दशपदी म्हणजे 'विराणी'. 'तटस्थ' आणि 'आश्विन' या कवितांनी दशपदीची दिशा दाखवली हे मात्र खरं. 'विराणी' लिहिली त्याच काळात या लिहिलेल्या – १९५९ च्या. पण १९४९ मध्ये लिहिलेली माझी एक कविता आहे. दशपदीच्या रूपाशी मिळतीजुळती. 'आज अंधारी रात आहे / चंदेरी दरिया नसे'"
"म्हणजे दशपदी हा एक दशवार्षिक शोध आहे!" असा काहीतरी बालिश विनोद करण्याचा मोह मला झाला. पण 'विराणी'तील ओळी आठवू लागल्या होत्या. अनिलांच्या शब्दांत माझे शब्द बुडून गेले होते...

आभाळ खाली वाकलेले मेघ काळे क्रूर
गुडघा गुडघा चिखल आणि ओढयांनाही पूर
नुसता गडद अंधकार वीज चमकत नाही
काळी माती काळे रान मला मीही दिसत नाही

या कवितेसंबंधी बोलताना पूर्वी एकदा अनिल म्हणाले होते, "इथं 'विराणी' हा शब्द रूढ अर्थानं वापरलेला नाही. म्हणजे ही ज्ञानेश्वरांच्या विराणीसारखी विराणी नव्हे. इथं विराणी हा विरण्याचा अनुभव किंवा विराण, वैराण (desolate) वाटावं अशी अवस्था.

हारल्याची हरवल्याची जाणीव सलत राहते
अशा वेळी काळोखात विरून जावे वाटते!

लहानपणी बैलगाडीतून प्रवास केला होता. त्या वेळी अंधाराची, आभाळाची फार भीती वाटली होती. ती प्रतीती मोठेपणी जागी झाली. म्हणून 'आभाळ खाली वाकलेले'...आपण हरलो हा मूड होता. त्यातच बीजरूपानं सगळी कविता होती. बीज सोडून कवितेचा विकास होता कामा नये. ते केंद्र असतं. ते सुटलं की कविता फसलीच! आणि ती फसली हे स्वतःलाच जाणवतं. माझ्याही अशा फसलेल्या कविता आहेत. पण थोड्या. कविता फसते आहे असं वाटलं की पुढं लिहीतच नाही."

स्वतःच्या कवितेविषयी, तिच्या निर्मितिप्रक्रियेविषयी अनिल किती सूक्ष्मपणे विचार करतात हे त्या वेळी जाणवले. दशपद्यांतील 'श्रावणझड', 'साथ', 'गतार्थ', 'झाले' यांसारख्या अनेक कवितांत त्यांनी कवितेविषयीच लिहिले आहे.

"आप्पासाहेब, तुम्ही सलगपणं, जलद कविता लिहिता ?"

"मुळीच नाही. फार वेळ लागतो. एक कविता सुचते — म्हणजे तिचे पहिले शब्द, तिची पहिली ओळ. त्यातच सगळी कविता बीजरूपानं असते. मनात आशयाचं तळं असतं. त्यात त्या पहिल्या शब्दांचा, ओळीचा गळ टाकून बसायचं. दोरी हलली की गळ काढायचा बाहेर. त्यात दुसरी ओळ. असं चाललेलं असतं. एकेक कविता लिहायला आठआठ दिवस लागतात !- अन् एकदा ती लिहिली की ती मनातून अनेक दिवस हलतच नाही ! मग दुसरी कविता लगेच कोठून लिहिणार ?"

"पण 'सांगाती'तील काही कविता तर रोज एक याप्रमाणं लिहिलेल्या आहेत."

"तसंही होतं. पण प्रवासात असलो तर. म्हणूनच प्रवास फार आवडतो आपल्याला. कोणतीही व्यवधानं नाहीत. शांतपणं विचार करावा, लिहीत राहावं...आता 'चिरयौवन' या कवितेचंच पाहा. त्या वेळी एकसारखा प्रवासात होतो. मनात कविता घडत होती. ओळी जुळत होत्या. पण त्या वेळी लिहून काढायला अवसर नव्हता. जुळलेल्या ओळी नुसत्या टिपून ठेवल्या होत्या इतकंच. मग जरा निवांतपणा मिळाला. सगळ्या ओळी एकत्र केल्या. त्यात आठ ओळींचा एक स्तंभ आहे. असे एकूण चार याम आहेत...त्या कवितेत चार ओळींचे तुकडे पाडणं हे अगदी चुकीचं आहे."

अनिलांच्या पुस्तकांत ही 'मांडणी'ची दक्षता जाणवते. प्रत्येक पुस्तक देखणे, कवितेच्या अर्थाला उठाव देणारे. 'फुलवात'चे मुखपृष्ठ कुसुमावतींनी तयार केले होते. 'भग्नमूर्ती' सर्वच दृष्टींनी वेगळे. 'निर्वासित चिनी मुलास' आणि 'पेर्तेव्हा', 'सांगाती' यांना गोडशांची मुखपृष्ठे आहेत. 'पेर्तेव्हा'ची निर्मिती हा तर एक स्वतंत्र विषयच आहे. स्वतः प्रकाशक व चित्रकार त्यात कसे गुंतलेले होते याविषयी मी अनेक कथा ऐकल्या आहेत. ती पुस्तके अजून डोळ्यांसमोर येतात, डोळ्यांना सुख देतात...

"पुनर्लेखन करता ?"

"अगदी क्वचित. काही वेळा सुचतानाच घाई होते. मग एक्सप्रेशनमध्येही तीच घाई. अशा वेळी पुन्हा नजर फिरवावी लागते. पण कविता सावकाश लिहितो. लिहितानाच शब्द, ओळी बदलतो. त्यामुळं पुनर्लेखनाचा प्रश्नच

फारसा येत नाही. कधी लिहीत असताना दोन शब्द झगडतात. ‘काळी’ ही कविता आठवते ना? ‘काळी धरती सुघड सावळी गरतीपरीस हिचे राहणे’ या ओळीत आधी ‘सपाट’ हा शब्द घातला होता. पण नंतर वाटलं, ‘सुघड’ हाच शब्द अधिक योग्य! कारण अनेक वर्षे ती घडते आहे. शिवाय, ‘गरतीपरीस’ या वर्णनालाही ‘सुघड’ हा शब्द अधिक शोभून दिसतो…”

या कवितेबद्दल अनिलांनी एक लेख लिहिला होता. इतर कवितांवरही ते सविस्तर बोलतात. त्यांतील शब्दयोजना, कल्पना यांच्यावर भाष्ये करतात. प्रत्येक शब्दाला एक समर्थन असते. ‘श्रावणझड’ या कवितेत एक ओळ आहे : “उथळ उथळ पल्वलांत संगळून जळ बसते” या ओळीतील ‘पल्वल’ हा शब्द आवडला नाही असे कोणीतरी सांगितले. अनिलांनी तो योजला कारण तो ‘अजविलापा’त आहे. शब्द संस्कार घेऊन येतात असे त्यांचे म्हणणे. ‘लावण्य’ या कवितेबद्दलही त्यांनी असेच काहीतरी सांगितले होते. कालिदासाची ‘रम्याणि वीक्ष्य’ या श्लोकातील कल्पना लक्षात राहिली. प्रश्न पडला, ‘रम्य’ म्हणजे काय? त्याचे उत्तर ‘लावण्य’ लिहिताना आपोआप मिळाले.

असे काहीतरी आगळे लावण्य केव्हा कधीकाळी दिसून जाते
वेगळ्या सौंदर्य-पर्युत्सुक जीवा जन्मांतरीचे सांगत नाते

‘पर्युत्सुक’ हा शब्द आपोआप आला. त्यामुळे मूळ कल्पनेशी दुवा जुळला. याला अनिल ‘श्रुतयोजना’ म्हणतात. एखाद्या कवीने फार चांगले असे काहीतरी म्हटलेले असते. पण तरीही ते वाचत असताना आणखी काहीतरी म्हणण्याजोगे उरले आहे अशी भावना निर्माण होते. म्हणून ती मूळ कल्पना घेऊन आणखी पुढे जाणे म्हणजे ‘श्रुतयोजना’. ‘लावण्य’ या कवितेबद्दल आणखीही काही गोष्टी अनिलांनी सांगितल्या होत्या. “‘नसते निव्वळ गात्रांची चारुता त्याहून अधिक असते काही’ ही ओळ कुसुमला फार आवडली होती…या कवितेत ‘आभा’ हा शब्द चांगला पडला आहे…ही कविता लिहिली तेव्हा तिचा अर्थ पुरा कळला नव्हता. कुसुमनं विचारलं, ‘अर्थ काय?’ उत्तर दिलं, ‘ठाऊक नाही!’

पुढं उमगलं की प्रत्येकाच्या मनात एक सौंदर्याचा पॅटर्न असतो. त्यालाच या कवितेत मूर्त रूप मिळालं असावं...

पुन्हा तहानेले होतात प्राण मन जिव्हाळा धाडून देते
जागच्या जागीच राहून हृदय प्रीतीचा वर्षाव करून घेते !

...ते सौंदर्य पुन्हा प्यावंसं वाटतं. पण स्वामित्व नको असतं. म्हणून 'जागच्या जागीच राहून'...हा खास माझा टच. अनेक कवितांत तो दिसेल !"

—अनिलांनी आपल्या कवितांवर आणखी खूपच लिहिले पाहिजे.

"तुम्ही सांगितलं होतं की दशपदीच्या पहिल्या सहा ओळीं आधी सुचतात; मग शेवटच्या दोन; अन् मग मधल्या ! हे कसं काय ?"

"कोण जाणे ! पण कधीकधी असं होतं खरं."

"काही सांगायचं राहून गेलं असं वाटत नाही ?"

"मुळींच नाही. उलट, प्रत्येक ओळ कशी वर वर चढत गेल्यासारखी. शेवटची ओळ तर कळसासारखी. 'दशपदी'त तर हे समाधान पूर्णार्थानं लाभतं."

"आणि इतर कवितांत ?"

अनिलांनी या प्रश्नाचे उत्तर दिले नाही. त्यामुळे "दशपदी लिहू लागल्यानंतर तुम्हांला पूर्वीसारखा मुक्तछंद लिहावा असं वाटलंच नाही का ?" हा प्रश्न मी विचारला नाही. कवितेबद्दल आपल्याला पडणारे सगळेच प्रश्न विचारू नयेत; आणि सगळ्याच प्रश्नांची समाधानकारक उत्तरे कवीजवळ तयार असतात असे गृहीत धरू नये.

•

"आप्पासाहेब, तुम्हांला तुमच्या एकदोन कवितांबद्दल विचारायचं आहे. पण त्याआधी गझलाबद्दल सांगता ?"

"पुष्कळ सांगता येण्याजोगं आहे. आता माधव जूलियन यांचे गझल घ्या. त्यांत 'गझल' हे वृत्त आहे. पण वास्तविक ते केवळ वृत्त नाही. ती एक वृत्तीही आहे. गालिब हा गझलांचा राजा. काही लोक हजूल लिहितात!"

"हजूल म्हणजे काय?"

"आपली गंमत. माझाच एक हजूल सांगतो:

तसा आहे अजून यौवनातच मी
पण या पांढऱ्या केसांनी दगा दिला
म्हणतात पोरीबाळी आजोबा, बरे वाटते
पण या प्रौढा—
त्यांनी काका म्हणून दगा दिला!"

अनिलांच्या खास मिस्किल वृत्तीतून आलेल्या या ओळी. हा मिस्किलपणा कवितेत आहे; तसाच संभाषणातही. तासन्‌तास कसे निघून जातात हे कळत नाही...पण हे तीन तास मात्र संपत आले आहेत. डेक्कन क्वीन मुंबईच्या परिसरात शिरली आहे. संभाषण आवरते घेतले पाहिजे.

"तुम्ही अलिकडे चांगले गझलही लिहिले आहेत, आप्पासाहेब."

"'वाटेवर काटे वेचीत चाललो' हा चांगला गझल आहे. यात शेवटी 'चाललो' हा शब्द येतो. दुसऱ्या ओळीत तोच. याला 'रदिफ' म्हणतात. रदिफ म्हणजे उंटावरून जाणाऱ्या माणसाला बसणारा धक्का. तिसऱ्या ओळीत रदिफ नाही. चौथ्या ओळीत आहे. 'मी', 'पुन्हा' या गझलांची बांधणीही अशीच आहे. रदिफच्या अलिकडचं अक्षर म्हणजे 'काफिया'. तेही सांभाळावं लागतं. पण आटापिटा नसावा. सगळं स्वाभाविक वाटलं पाहिजे."

द
श
प
दी
•
•
•
अ
नि
ल

"तुमचे गझल दहा ओळींचे आहेत. म्हणजे त्या दशपद्याच. गझल आणि दशपदी यांत फरक काय?"

"मोठाच फरक आहे! गझलात दोन ओळींचा एक तुकडा असतो. त्याला शेर म्हणतात. असे पाच शेर म्हणजे गझल. प्रत्येक शेर स्वयंपूर्ण. या शेरांत कल्पनासाम्य असलं तरी आशयसाम्य नसतं. माझ्या गझलात मात्र शेर स्वयंपूर्ण नाहीत. म्हणूनच मी त्याला दशपदी म्हणतो. ते लिहितानाही दोन-दोन ओळींचे तुकडे पाडून लिहीत नाही."

अनिलांच्या गझलांना एक उर्दू ढंग आहे. 'झाले'सारख्या दशपदीतही तो जाणवतो. हा ढंग आकस्मिकपणे आलेला नाही. अनिलांनी पूर्वीपासून उर्दू कविता प्रेमाने वाचलेली आहे. तिचे संस्कारही त्यांच्यावर झाले आहेत. 'चिरयौवन' या कवितेचे 'अभी तो मैं जवान हूं' या हफीज जालंदरींच्या रचनेशी असलेले साम्य सर्वांना ठाऊक आहेच. 'सारेच दीप कसे' किंवा 'पाहतो हे सर्व आम्ही' या कवितांच्या शब्दयोजनेतही हे संस्कार डोकावतात. 'चिरयौवन' लिहिण्या-पूर्वी हफीज जालंदरी घरी आले होते. त्यांनी 'अभी तो मैं जवान हूं' ही त्यांची कविता वाचून दाखवली. अनिलांना ती कविता आवडली. पण वाटले की या कवितेतील 'जवान' हा शब्द विशिष्ट वयाशी निगडित आहे. 'यौवन' ही मात्र एक वृत्ती आहे. म्हणजे प्रेरणा हफिज जालंदरींच्या कवितेने दिली हे खरे असले तरी अनिलांनी 'चिरयौवन' आपल्या पद्धतीने लिहिली आहे. असे ते संस्कार आत्मसात करतात व त्यांना आपल्या स्वतंत्र प्रज्ञेचा स्पर्श देतात. उत्तम संस्कार आहेत, अजूनही संवेदनाक्षम राहिलेले मन आहे. पण कविता मात्र थोड्याच. खास उर्दू ढंगात ते म्हणतात,

मी थोड्याच कविता लिहिल्या तर कुठे काय थोडे झाले
इतक्या लिहिल्या गेल्या हातून हेच काय थोडे झाले

या पंधरा वर्षांत फक्त सव्वीस कविता. पण प्रत्येक कविता एखाद्या खणखणीत वाजणाऱ्या नाण्यासारखी. कोणतीही घाई न करता, संपूर्ण विचार करून लिहिलेली. म्हणूनच प्रत्येक कविता पाठ. तिचे विवरण मनात तयार. 'काळी'वरील लेख अनिलांनी अगदी सहजपणे लिहिला असेल. असे आणखीही काही कवितांबद्दल सांगितले आहे. संभाषण संपविण्यापूर्वी

त्यांबद्दल विचारले पाहिजे...

•

"आप्पासहेब, 'अदृष्ट' या कवितेबद्दल तुम्ही पूर्वी एकदा काही सांगितलं होतं."

"हो. पहिल्या ओळी आठवतात ना?

इंद्रधनुष्याची कमान जेथून निघता दिसली वारुळातून
तेथपर्यंत तू दिलीस साथ सात रंगांच्या वर्तुळांतून

यांतील कल्पना कालिदासाच्या 'मेघदूता'त आहे. 'वल्मीकाग्रात् प्रभवति धनुःखंडमाखंडलस्य' या ओळीत. ती मनात दडून होती. वारुळ म्हणजे जग. 'तेथपर्यंत तू दिलीस साथ...' पुढं काय झालं? तू हरवलीस. मग माझा शोध सुरू झाला...'शोधिता अश्रूंच्या भिंगांतून तुला अंधार डोळ्यांस आता विचारतो'...कालिदासानं अश्रूंना मोती म्हटलं आहे. इथे अश्रू म्हणजे भिंग. म्हणजे या शब्दाला एक scientific sense आहे. इरावतींना ही ओळ फार आवडली होती. आता या कवितेतील इतर शब्द, कल्पना पाहा. संध्येनं 'जाड पडदा' टाकला. त्यामुळं सगळंच झाकलं गेलं. या वेळी दुःखाचे एरवी पांगलेले काळे ढग एकत्र झाले. अपारदर्शक काळोख तयार झाला. 'माथ्यावर केली दाट काळोखाच्या मुळी न फाटल्या छत्राची छाया...' त्यात एक फटही नाही. तर मरणानंतर काय हे कळणार कसं? सगळंच अद्‌भुत, मंतरलेलं. दृश्यात हालचाल नाही. आणि ध्वनीतही चाहूल नाही. तो प्रतिध्वनीला अंतरलेला. निर्जीव पुतळ्यासारखा.

गिळतात हालचालींच्या चाहुली दिशांच्या बाहुल्या मंतरलेल्या
ध्वनींचे करीत निर्जीव पुतळे प्रतिध्वनींना अंतरलेल्या

अशा वेळी अंधाराला मी प्रश्न विचारायला हवा. पण तोच मला विचारतो :

शोधिता अश्रूंच्या भिंगांतून तुला अंधार डोळ्यांस आता विचारतो
कुठे धरित्रीचे चरित्र संपते कुठे आभाळाचा आरंभ होतो !"

अत्यंत स्वच्छ विवरण. ही कविता अनिलांनी एका समुद्रप्रवासात लिहिली. लौकरच ही उदासीनता विरली. एक वेगळाच मूड आला. मग 'फुलाचे आयुष्य' ही कविता लिहिली. काळ पुढे सरकत असतो. एखाद्या दिवशी साथ हरवल्याची भावना कमी तीव्र होते. पण ती संपूर्णपणे नाहीशी कशी होणार?

कितीक काळ हालला असा तुझ्याविना....

"कित्येकदा 'तुझ्याविना' आयुष्य पुढं सरकलं कसं, याचं आश्चर्य वाटतं. आश्चर्य. तक्रारी नाहीत. त्याही करता आल्या असत्या. पण तक्रारी न करता अगदी सहज म्हणावंसं वाटलं,

कितीक काळ हालला असा तुझ्याविना
कळे न श्वास चालला कसा तुझ्याविना

या ओळी सुचल्यानंतर दोन तास थांबलो. मनात फक्त त्या ओळी. तिसरी ओळही अशीच अचानक सुचली.

दहिवरल्या प्रहरातुन वाट पाहते पहाट

या ओळीत शब्दांचं संगीत आहे. सकाळचा प्रहर दवानं भिजलेला — म्हणजे इथं अश्रूंची सूचना आहे. दरवळलेला बहर गळतो आहे.

बहर गळे दरवळला कसा तुझ्याविना

ग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.
शाखा

या ठिकाणी 'कसा' म्हणजे 'कशा प्रकारे' असाही अर्थ अन् 'याचं कारण काय?' असाही अर्थ. आता सकाळनंतर दुपार. हा काळाचा क्रम आपोआप आला. सबंध कवितेत तो आहे पाहा.

लवथवत्या पानावर गहिवरते भरदुपार

...ही दुपार पानांना 'लवथवती' करणारी—हा शब्द 'लवथवती विक्राळा' या आरतीतला—पण तीच तेव्हा गहिवरते. पुन्हा थांबलो. हिच्या तोडीची दुसरी ओळ सुचणं कठीण वाटलं. पण ती गळाला लागली.

ज्वरभरला दिवस ढळे कसा तुझ्याविना

'ज्वर' का? तर These were days of feverish activity. दिवस ढळला. अंधार आला...

तमामधुन सावकाश उजळे आकाश निळे

आता या ओळीचा अर्थ काय? तर दुःखाचं साचलेलं तम निवळतं. हळूहळू उजळू लागतं. It takes its own time to clear up.

चळे उदास चंद्रमा कसा तुझ्याविना

इथं 'चळे'ला दोन अर्थ आहेत. एक तो 'मोहात पडलेला' असा; अन् दुसरा 'तो सैरभैर झाला आहे' असा. आता शेवटच्या दोन ओळी लिहिणं हे मोठंच आव्हान होतं. म्हटलं, घाई करण्यात अर्थ नाही. एक दिवस थांबल्यानंतर पुन्हा त्या ओळी गळाला लागल्या!

ताऱ्यांचा धरुन भार रात्रिस उरते न त्राण
स्मरणावर प्राण जळे कसा तुझ्याविना!

...रात्र. एरवी ती ताऱ्यांचा भार सहन करते. पण आज मात्र तिला ते त्राण उरलेलं नाही. आणि शेवटच्या ओळीतील 'स्मरण' हा शब्द पाहा. 'सरण' या शब्दाचे प्रतिध्वनी उठवणारा. शेवटची ओळ सुचल्यावर पाठ थोपटून घ्यावीशी वाटली."

•

मी मूक झाले होते. भूतकाळाकडे मागे वळून पाहणाऱ्या, स्वतःचे एकटेपण सांगणाऱ्या, आणखीही काही दशपद्या आठवत होत्या. त्यांचे भावनिक संदर्भ आठवत होते. त्यामुळे उदास झाले होते. पण नंतर वाटले, हा कवी कुठे उदास आहे? तो कुठे कुढतो आहे? त्याने आपला जीवनप्रवास आनंदाने केला आहे. काटेही फुलांसारखे वेचावे हे त्याचे तत्त्वज्ञान आहे. कधी मेळ्यात रमावे, कधी आपलीच सोबत शोधावी; आधीचा प्रसाद घ्यावा, पुढची साद ऐकावी; चुकावे आणि सावरावे...आणि कधीतरी खांद्यावर बाळगलेले सुखदुःखांचे ओझे फेकून देऊन परत निघून जावे...यात कठीण काय आहे? फक्त 'नसे मुमूक्षु, मुक्त मी' हा विश्वास हवा. तो असला की कोणतेही तीव्र आघात पेलण्याचे सामर्थ्य येते. अनिलांनी हा विश्वास बाळगला; आपल्या कवितेतून इतरांना तो दिला.

हारल्याची जाणीव अधूनमधून होतेच; एखाद्या क्षणी 'सारेच दीप कसे मंदावले आता!' असेही वाटते. पण अशा मनःस्थितीत एखादी चांगली कविता वाचनात येते. अभ्रे वितळू लागतात. सगळे स्वच्छ, नितळ वाटते. "तमामधुन सावकाश उजळे आकाश निळे". दोन वर्षांपूर्वी, तो प्रवास आणि ते मनमोकळे संभाषण संपवताना मला अगदी असेच वाटत होते. सारेच दीप उजळल्यासारखे. वाटले, अनिलांना हे सांगावे. पण त्या वेळी सांगितले नाही. आज मात्र, सांगावेसे वाटते आहे : हे उजळलेले क्षण तुम्ही आम्हांला दिलेत. आम्हांला आणखी काय हवे आहे? आणि तुम्हांला तरी आणखी काय हवे असणार आहे?

विजया राजाध्यक्ष

दशपदी

• • •

अनिल

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संदर्भ शाखा

द
श
प
दी
•
•
•
अ
नि
ल

## विराणी

आभाळ खाली वाकलेले मेघ काळे क्रूर
गुडघा गुडघा चिखल आणि ओढ्यांनाही पूर
नुसता गडद अंधकार वीज चमकत नाही
काळी माती काळे रान मला मीही दिसत नाही
हाती दिवा होता त्याची कधीच विझून गेली वात
कशानेही उजळत नाही अशी काळीकुट्ट रात
आहे ओळखीचे पुष्कळ काही दूर जवळ काही
असून नसून सारखेच मी कुठे हे कळत नाही
हारल्याची हरवल्याची जाणीव सलत राहते
अशा वेळी काळोखात विरून जावे वाटते !

## तदात्मता

जेव्हा फुलांच्या पाकळ्यांवरी सूर्याचे किरण खेळू लागती
आणि कळिकांच्या अंगाभोवती मायेची जाळी विणू पाहती
केळीची कवळी लुसलुशीत पाने हळुवार कुरवाळती
अमलताशाच्या फुलझुंबरांत शिरून पिवळे झोत पाडती
उसांच्या असंख्य तुऱ्यांवरती प्रकाशलहरी डोलत जाती
रुपेरी राखी रंगांच्या लाटा हिरव्या शेतात उसळविती
दुर्वांकुरांच्या अग्रांवरती लाख टिकल्या उजळतात
कवडशांतून धूलिकणांच्या विश्वाचा विस्तार पाजळतात
तेव्हा संवेदना अबोध काही तदात्मतेची थरारून जाते
प्रीतीचा पहिला स्पर्श जाणवून सारे अंगांग शहारून येते !

## एक दिवस

जीव लागत नाही माझा असा एक दिवस येतो
कधी अधूनमधून केव्हा लागोपाठ भेट देतो
अशा दिवशी दुरावलेले उजाड सारे आसपास
घर उदास बाग उदास लता उदास फुले उदास
वाटते आयुष्य अवघे चार दिवसांचेच झाले
कसे गेले कळले नाही हाती फार थोडे आले
दोन दिवस आराधनेत दोन प्रतीक्षेत गेले
अर्धे जीवन प्रयत्नात अर्धे विवंचनेत गेले
आस हरपलेली असते श्वास थकले वाटतात
अश्रू बाहेर गळत नाहीत आत जळत राहतात !

## आणीबाणी

अशा काही रात्री गेल्या ज्यांत काळवंडलो असतो
अशा काही वेळा आल्या होतो तसे उरलो नसतो
वादळ असे भरून आले तारू भडकणार होते
लाटा अशा घेरत होत्या काही सावरणार नव्हते
हरपून जावे भलतीकडेच इतके उरले नव्हते भान
करपून गेलो असतो इतके पेटून आले होते रान
डाव असे पडत होते कि सारा खेळ उधळून द्यावा
विरस असे झाले होते जीव पुरा विटून जावा
कसे निभावून गेलो कळत नाही कळले नव्हते
तसे काही जवळ नव्हते – नुसते हाती हात होते !

## तळ्याकाठी

अशा एखाद्या तळ्याच्या काठी बसून राहावे मला वाटते
जिथे शांतता स्वतःच निवारा शोधीत थकून आली असते
जळाआतला हिरवा गाळ निळ्याशी मिळून असतो काही
गळून पडत असताना पान मुळी सळसळ करीत नाही
सावल्यांना भरवीत कापरे जलवलये उठवून देत
उगीच उसळी मारून मासळी मधूनच वर नसते येत
पंख वाळवीत बदकांचा थवा वाळूत विसावा घेत असतो
दूर कोपऱ्यात एक बगळा ध्यानभंग होऊ देत नसतो
हृदयावरची विचाराची धूळ हळूहळू जिथे निवळत जाते
अशा एखाद्या तळ्याच्या काठी बसून राहावे मला वाटते !

## खेळणी

खेळणी सुंदर लहानपणी माझ्यापाशी होती नाना तऱ्हेची
काही पेरकुंडी स्वतः केलेली काही पितळी काही लाकडाची
चिनीच्या भावल्या जरी नव्हत्या तरी होते दोन मातीचे बैल
काही कळसूत्री करामती होत्या कमान ज्यांची पडते सैल
पुढे हाती आल्या काचेच्या गोट्या भोवरे चक्र्या एक एकामागे
पतंग लहानमोठे ढवाया घोटले मजेत मांज्याचे धागे
फोडली मोडली किती खेळणी फुटून फाटून आपोआप गेली
थोडे रडू आले पण त्यातूनच नव्यानव्याची हौस वाढली
खेळण्यांच्या जागी खेळ आले आणि जीवनाचाही खेळ झाला काही
बाळखेळण्यांमधून मन अजून निघता निघत नाही !

## पावसाळी सांज

इकडे मावळे पावसाळी सूर्य तिकडे उगवे चंद्र पुनवेचा
दोन्हीही निस्तेज झाकळलेले दोघांचीही मंद किरणवाचा
धुंद वाऱ्याचीही उतरलेली हवा कुंद नभ ढगाळलेले
प्रकाशकवाडे बंद झालेली ताऱ्यांचे काकडे विझवलेले
मिसळून गेले अंधुक आकार क्षितिजाची रेघ पुसटलेली
घुंगट घेऊन तोंडावर लांब संध्या नकळत निसटलेली
मध्येच साशंक थबकली रात्र एकांती भिजली वस्त्रे वाळवीत
समेवर येता थांबून राहिली पृथ्वी पूरियाचे सूर आळवीत
उघडझापीत ओल्या पापण्यांच्या दिसणारे शून्य मन पाहते
एकीकडे उरी भरून येते एकीकडे रिते होत राहते !

## दोन वाटा

वाटचुकार वासराशिवाय फिरकलेले कोणी नसते
अशा जागी गेली वाट सरत सरत आली असते
तिथे पुन्हा दोन वाटा फुटलेल्याच्या खुणा दिसतात
एक जरा सरावलेली दुसरीवरती ठसे नसतात
तिने चाहूल नाही म्हणून पाऊल पाऊल ओढून नेले
सोडून दिल्या वाटेकडे फिरून फिरून पाहू दिले
किती वेळ दिसत होती धरली नाही तीच वाट
तिची वळणे हेलकावे तिचे उतार तिचे घाट
तिनेच गेलो असतो तर ही कदाचित मिटली असती
तसे व्हावयाचे नव्हते—हीच माझी वाट होती !

# जुई

पावसाची सर ओसरून जाते उगाच तुषार भिरभिरती
इवल्या इवल्या फुलीं भरलेल्या अंगनिथळत्या जुईभवती
आधीच हळवा सुवास कोमळ त्यात जळाआत विरघळला
ओल्या झुळुकीत भरून वारा नेत असतो अशा वेळेला
तलम ढगांच्या सात घड्यांतून गाळीव पडते सौम्य चांदणे
जाळीच्या पडद्यामधून दिसते जुईचे नितळ रूप देखणे
कवळ्या फांद्यांचा लवचिक बांधा पाचूच्या पानांत झाकून घेत
शुभ्र शुचितेची सौजन्यकांती हिरवे लावण्य लेऊन येत
मादकता जाते मार्दवी विरून सौंदर्य सोज्वळाआड दडते
सोलीव सुखाचे स्वप्नच एक जीवाला जागतेपणी पडते !

## श्रावणझड

श्रावणझड बाहेरी मी अंतरि भिजलेला
पंखीं खुपसून चोच एक पक्षि निजलेला
अभ्रांचा हृदयभार थेंब थेंब पाझरतो
विझलेला लांब दिवस चिंब होत ओसरतो
उथळ उथळ पल्वलांत संगळून जळ बसते
क्षणजीवी वर्तुळांत हललेसे भासविते
चळते प्रतिबिंब जरा स्थिर राहुन थिजताना
बिंदुगणिक उठलेले क्षीण वलय विरताना
झिमझिम ही वाऱ्यासह स्थायी लय धरुन असे
संमोहन निद्रेतुन शब्दांना जाग नसे !

## शरदागम

आभाळ निळे नि ढग पांढरे हवेत आलेला थोडा गारवा
कोवळी सकाळ मनमोकळी धरातळी रंग एक हिरवा
साचून राहिल्या गढूळ पाण्याची हळूहळू झाली निर्मळ जळे
काठावर उभ्या राहून बाभळी वाकून पाहती रूप सावळे
टवटवलेली सारीच शेते ज्वारीच्या कुसेत अधीर होत
टपोर गर्भ तान्ह्या कणसाचा पान-आडोशात जन्मास येत
काळजी करते काळी माती कशी अजून कपाशी नाही फुलली
चौकशी कराया पंख हालवीत निळे तास पक्षी उतरती खाली
शेवंतीला कुणी उगीच सांगे इतक्यात तुझी वेळ आली नाही
गवताचे सोने होण्याआधीच पिवळ्या फुलांची नको करू घाई !

## लावण्य

असे काहीतरी आगळे लावण्य केव्हा कधीकाळी दिसून जाते
वेगळ्या सौंदर्य-पर्युत्सुक जीवा जन्मांतरीचे सांगत नाते
नसते निव्वळ गात्रांची चारुता त्याहून अधिक असते काही
ठाव त्याचा कधी लागत नाही आणि आठवण बुजत नाही
रूप रेखेत बांधलेले तरी मोकळी खेळते त्यातून आभा
डोळ्याआडच्या दीपज्योतीहून निराळी भासते प्रकाशप्रभा
आधीच पाहिले पाहिले वाटते पहिलेच होते दर्शन जरी
स्मरणाच्या सीमेपलिकडले कुठले मीलन जाणवते तरी
पुन्हा तहानेले होतात प्राण मन जिव्हाळा धाडून देते
जागच्या जागीच राहून हृदय प्रीतीचा वर्षाव करून घेते !

## एकाकी

स्वप्नातल्या मुक्या सावलीसारखी दिसते अशी का आकृती तुझी
बोलत नाहीस ऐकूही न ये का गळ्यात दाटली हाक तुला माझी
खुणांनीच काही सांगू पाहसी किती होती त्यांचे अर्थ वेगळे
काय समजू मी जोवर ठेविसी झाकून असे पापण्यांत डोळे
भिजल्या आहेत पाऊलवाटा आता साऱ्या तुझ्यामाझ्यामधल्या
मिटल्या आहेत जळावरल्या पुसट प्रकाशलाटा शेवटल्या
परतून गेले आहेत सगळे आठवणींचे पक्षी थकलेले
दूर कोठेतरी अज्ञात स्थळी घरट्यांत आता गाढ निजलेले
आधारच तुझ्या पायाखालचा निघून गेला कसा एकाएकी
ज्यावर आहे मी अजून चालत तुझ्यावाचून वाट एकाकी !

## साथ

पायांत बांधून स्पंदनाचे चाळ चालायाचे आहे वाऱ्याच्या सवे
त्याच्या गतीला साथ देत आणि त्याच्या विरामांत घेत विसावे
अधर शब्दांच्या केव्हा निःशब्दाच्या असतात त्याच्या सूक्ष्म हालचाली
ध्वनिलहरींच्या मृगजळापाशी अर्थग्रामाकडे दूर वाटचाली
हळू हळहळ केव्हा सळसळ कधी असतो नुसताच खेळ
त्यांच्याशीच पुन्हा साधावा लागतो खळखळींच्या कल्लोळांचा मेळ
पाय भुईवर टेकतच नाही पाउले टाकतो केव्हा जड काही
स्वताच्या भोवती रिंगण धरून कधी समेवर येतच नाही
थांबत थांबत जावे लागते त्याच्या एकेका बोलावरतीच
वसतीस कोठे राहावे लागते चरणांचे आवर्तन संपताच !

## गतार्थ

गतार्थ होतात सारेच शब्द आणि उरते वाचा नुसतीच
तेव्हा जीव मुका होऊन बसे बोलूही न शके आपल्याशीच
एकेक आलेला जिव्हेवर बोल निघण्याआधीच मन अव्हेरिते
मोल हारवता भाव भरलेले भाषेचे कोषही वाटती रिते
विवस्त्र क्लेशांना अंगे झाकण्यास मिळत नाहीत वैखरीचे वेष
वाणीचा जन्मच होण्यापूर्वीचा घुमतो केवळ वेदनांचा घोष
ठायीच्या ठायीच पडून राहतो सारा जमलेला थाट मेळाचा
मृदंगाचा मुखलेप तडकतो उतरतो साज स्वरशृंगाराचा
झंकृत असता कोमल धैवत सारंगीचा तंतू तुटून जातो
अवघा संसार संवादजीवी अवचित असा असंपृक्त होतो !

## माघ

संध्येच्या रंगछटा वृक्षावर अडलेल्या
लांब लांब पडछाया पुसट फिकट पडलेल्या
शेंगांचे पिवळेपण कण्हताना रुणझुणते
उदासीन फांद्यांवर रूक्ष जिणे गुणगुणते
कललेल्या उन्हामधुन दिवस पुन्हा ढळलेला
आळसल्या क्षितिजाला अर्थ सकळ कळलेला
उरलेली कळ लपते कळकांच्या पोटांतच
खडकांना बळ मिळते विस्मृतिच्या घोटांतच
वाटांच्या कुटिल जटा वळशांतच आवळल्या
दीर्घ उभा माघ निघे मागावर झाकळल्या !

## फाल्गुन

फाल्गुनाची आगलावी जंगले ही वाळक्या काड्यांत ह्यांच्या
आगळीकीच्या चहाड्या तप वडाचे भंगलेले पाहिल्याच्या
अंगभरत्या वनलतांच्या नेणत्या नव किसलयांशी कोवळीकी
चोरट्या करवंदिचे चवचाल चाळे आडवळणी वेगळीकी
शीर्ण पाने ढाळता निःसंगतेने पळस कासावीस होतो
लपवताना वासनांचे सोस सहसा संयमा सोडून देतो
पेट घेतो असह भगव्या धगधगीतुन ओल उरलेला उमाळा
भडकती अंगारज्वाळा मरमली काळ्या कुसुंबी पुष्पमाळा
भरवश्याच्या पिंपळावर आळ येते वल्कलांच्या वल्गनांची
ही वने पस्तावलेली भाळलेल्या वंचनांची फाल्गुनाची !

## माड

भरतीच्या लाटांना काठांनी कवळावे
की आल्या पावलीच माघारी वळवावे
प्रश्न असे सागरास धरतीला नच पडले
मूळातुन माडाच्या काळजात धडधडले
पायतळी वाळूने रोज पुढे सरकावे
कुठल्या तळहातांनी किती वेळ अडवावे
पानांना हलवावे वाऱ्यांनी वाहवल्या
लववावे मानेला उंच फळे धरलेल्या
वळवाच्या मेघाने कणवाने बरसावे
माडाने आलेल्या घटकेला टाळावे !

## प्रीती

किती किती किती म्हणत कितीदा कितीतरी प्रीती दिली घेतली
कधी न वाटली झाली रिती रिती भरतीवरती भरतीच आली
खूप रंगलो खूप गुंगलो खूप दंग एकामेकांत झालो
बोललो खूप नि खूप बोलविले खूप वेळ मुके मुके राहिलो
दुःख भोगिले पुष्कळ प्रेमाचे पुष्कळच सुख उपभोगिले
पुष्कळ पुष्कळ साठविले आणि पुष्कळ पुष्कळ उधळून दिले
फार फुलविला फुलांचा ताटवा फार मिळविला गळ्यात गळा
फार फार जिवा लाविला ळळा नि आता वाढविल्या विरहाच्या कळा
सागरास रंग देता निळा निळा नभाने स्वतःचा फिका पाडला
आणि आभाळास हृदयी धराया जळाने आपला जीव पाखडला !

## कालव

दूरच्या ढगांच्या काळ्या सावल्या निळ्या जांभळ्या दर्याच्या कडा
तळाशी दडल्या एका शिंपल्यात एक कालव नि खुपणारा खडा
कितीही अश्रूत घोळविले तरी त्याचा कधी मोती होणेच नाही
संकेतविव्हळ स्वातीचा पाऊस जळामध्ये जळ होऊन राही
सूर्याचे होतात उदय अस्त माध्यान्हीचे ऊन आत झिरपते
सागरात भार उरी धरलेल्या कवचात काही नच शिरकते
फेकीत ओढीत जरतारी जाळे चंद्रावरतून तरंगते रात्र
त्यात गावण्याचे भाग्य लाभते बेसावध भोळ्या मासोळ्यांना मात्र
कधीकाळी पण भरती ओहोटी सवेच न्यायाचे विसरून जाते
आणि कालवाला त्याच्या व्यथेसह कोरड्या वाळूत पसरून देते !

## उशिराचा पाऊस

असा उशिरा आलेला पाऊस तळहातावर झेलून घ्यावा
टिपून ल्यावा पापण्यांवरती कपाळीच्या घामामध्ये मिळवावा
डोईत पेरावा त्याचा ओलावा पाठीवरतून निथळू द्यावा
कोरड पडले ओठ उघडून वरच्यावरती चुंबून घ्यावा
त्याला बोलू नये अधिकउणे आणि काढू नये त्याचे बहकणे
खोटे भरवसे देत राहणे बहाणे सांगणे वेळा चुकवणे
सांगू नये त्याला आपले गाऱ्हाणे वाट पाहणे अधीर होणे
पापशंका मनी उभ्या ठाकणे पोटी धस्स होणे धुसफुसणे
त्याला उघडून क्षितिजाचे बाहू लाडेलाडे उरी घट्ट आवळावा
पाटघड्यांवर बसवून त्याशी कोडकौतुकाचा खेळ खेळावा !

## अदृष्ट

इंद्रधनुष्याची कमान जेथून निघता दिसली वारुळातून
तेथपर्यंत तू दिलीस साथ सात रंगांच्या वर्तुळांतून
नकळता तेव्हा निसटला हात पुढल्या अदृश्य किरणाआड
संध्येनेही थोडी घाईच केली टाकायाची निळा पडदा जाड
पांगलेल्या काळ्या ढगांनी लगेच मिळविल्या एकमेकांत काया
माथ्यावर केली दाट काळोखाच्या मुळी न फाटल्या छत्राची छाया
गिळतात हालचालींच्या चाहुली दिशांच्या बाहुल्या मंतरलेल्या
ध्वनींचे करीत निर्जीव पुतळे प्रतिध्वनींना अंतरलेल्या
शोधिता अश्रूंच्या भिंगांतून तुला अंधार डोळ्यांस आता विचारतो
कुठे धरित्रीचे चरित्र संपते कुठे आभाळाचा आरंभ होतो !

## फुलांचे आयुष्य

फुलांचे आयुष्य दिवसातासांनी नसते गणना करावयाचे
क्षण असतात जाणवलेले मधुसुवासाच्या अणूअणूंचे
कणाइतक्याच मधाच्या बिंदूने देठात भरते घटिकापात्र
प्रहराच्या घंटा वाजवितात पराग कळाया वाऱ्यालाच मात्र
पाकळ्यांचे कोष दाखवितात मानलेल्या दिनमानाच्या खुणा
भ्रमराच्या एका रुंजीएवढीच सूर्याभोवतीची पृथ्वीप्रदक्षिणा
किती साठविला प्रीतीचा गोडवा किती भारली हवा सुगंधांनी
ठरते ह्यातच जीवनसीमा फळांत मोजली जाते बीजांनी
तिथे सोयरीक मोडूनी आपली अवकाशाशी जुळवलेली
नांदत असते वेल्हाळ वेळा प्रेमात साद्यंत हरवलेली !

द श प दी • • • अ नि ल

## हलन्त्

फुटून तुकडे झालेल्या आरशासारखे जगत्
तोतरे वाचते अडखळलेले केनोपनिषत्
तुटक तुटक कवडशांचे आंधळे भगत्
रडतखडत म्हणतात पाठ केलेले स्वगत्
फटकून वागे फाटक्या काचांशी नभाचा फलक्
वाकड्यातिकड्या तेढ्या तुकड्यात तिरपी झलक्
अलग अलग सलगीची भाषा बोलतो क्वचित्
अधले भलते मधले सलते दाबून किंचित्
आरंभाला सूर न लागे न लाभे स्वराचा अन्त्
नांगर टाकूनी पडली नावांची व्यंजने हलन्त् !

## सगर्भ

अनवांछित गर्भाचे दिवस असे भरलेले
मन पहिलटकरणीसम प्रसवाला भ्यालेले
साहस अभिसाराचे आलेले अंगलटी
प्रिय सोडुन गेलेले खूण ठेवुनी उलटी
डोहाळे हिरमुसल्या डोहावर सांगितले
भुललेल्या सजणाला भलभलते मागितले
टवटवल्या कांतीवर बळजबरी लाजेची
एकांती अवघडली विश्रांती सुटकेची
उदरातिल नाजुकशा लाथेने जगलेले
वैभव हे सृजनाचे दैवाने ठगलेले !

## सावल्या

धडधडू लागते हृदय आणि दृष्टी अंधुक होते
तुझी सुकुमार मूर्ती जेव्हा अकस्मात तरंगत येते
तू आहेस स्वतः कि चित्र जिवंत झालेले
अश्रूंत विरलेले उसासे रूप घेऊन आलेले
तुझे जवळ जवळ घेणे आपण दूर दूर राहून
मी चूरचूर होताना तुझ्या यातना साहून
हे पाहणे असे हसणे गूढ नुसते जीव कुरवाळीत जाते
इथे माझे उरले असता तसेच सदेहाचे नाते
एक पडता उचलतो तर पटकन् पाच खाली पडतात
चुकून बाहेर आल्या सावल्या चटकन् त्यांच्या आत दडतात !

## चित्र

ह्या सुकल्या रंगांना आसवांत मिळ्वुन मी
पहिल्याने पाहियले चित्र तसे काढिन मी
ओतिन त्याआत जीव एकवटुन मी माझा
पण शिरेल काय तिथे प्रीतीचा प्राण तुझा
बांधणीत रेखांच्या तो तर नव्हताच मुळी
जुळवित घन आकारा बोटे फिरतील खुळी
एकएक रंग तुझ्या रंगातच बुडुन असे
डोळे असुनीहि मला दिसते काही न कसे
ते आतिल चित्र कधी बाहेर न येईल
आरंभासच अडेल पूर्ण कुठुन होईल !

## स्वान्त

स्वान्त स्तब्धतेची काजळी टाकिते कोंदून कोवळे प्रकाशाचे सूर
भीत क्षितिजाच्या कडा ध्वांत होता घट्ट आवळती आकाशाचे ऊर
आसवांचे धन पुरून ठेविल्या भूमीला येतात दचकून जाग
निःश्वासांच्या चोरपावलांवरती फूत्कार सोडिता मंत्राचा नाग
वाळल्या डोळ्यांच्या बाहुल्या होतात उलट्या वळून पाहता आत
ओळख नसले रूप आपलेच अंधाऱ्या कूपाच्या खोल जळात
जीवाला भुरळ पाडतात केश गहन निद्रेचे कुरळ काळे
आतुर तुर्येचे सावळे हात शेजेवर घेती ओढून बळे
जीवनाच्या स्तनकुंभस्पर्शासह मृत्यूचे चुंबिता अधर श्याम
आत्मविस्मृतीच्या रतीत ढळती कितीक रात्रींच्या गात्रांचे याम !

## झाले

मी थोड्याच कविता लिहिल्या तर कुठे काय थोडे झाले
इतक्या लिहिल्या गेल्या हातून हेच काय थोडे झाले
खूप लिहिल्या असत्या तर असते काय खूप झाले
म्हटले असते कुणी केव्हा पुढे काय खूप झाले
चारदोन आवडत राहतील हेही काय कमी झाले
बाकीच्यांत शोधत रहाल त्यांत काय कमी झाले
होऊन गेले थोर कवी त्यांचे काय पुढे झाले
तेच माझे आज आहे असते जे काय पुढे झाले
कधी सहज दाद दिलीत एवढे मात्र बरे झाले
तुमचे आमचे नाते निदान तेवढ्यापुरते खरे झाले !

## नाटक

दिवसाच्या रंगमंचावर जेव्हा पडदा सोडते शेवटचा रात्र
संपते नाटक एकदाचे ज्यात एकच अंक नि एकच पात्र
घाईत प्रेक्षक निसटतात झटकत मने रमविलेली
झटतो शोधाया आरशात नट स्वतःची सूरत गमावलेली
प्रकाशझोताच्या झगझगाटाचे काजळ डोळ्यांस चिकटलेले
चाटु प्रकटाच्या आतील त्रोटक स्वगत गळ्यात अटकलेले
कोंडलेले श्वास सुटकेचे घेत हटकणारांची तोंडे चुकवीत
पडतो बाहेर चोरदाराने लटके हासत माना तुकवीत
झाकल्या विश्वाचे खुले प्रेक्षागार गाठतो पाहाया नाट्ये विचित्रे
ज्यांत एकट्याच प्रेक्षकासाठी असंख्य प्रवेश नटलेली पात्रे !

## जीवन

जीवन असंच निघुन जाईल
तसंच मन पस्तावत राहील
उदासी परत पुन्हा छाईल
आत घर करित अंत पाहील
कुठंहि तरी हृदय झुरत नेईल
निसटुनी गेलेलंच चाहील
तगमगत जीव हाय खाईल
मोकलत धाय घाव साहील
अटकला प्राण कंठि येईल·
विरसल्या प्रीतीला वाहील !

## काळी

काळी धरती सुघड सावळी गरतीपरीस हिचे राहणे
टोपपदरात मान लववून डोळे उचलून वर पाहणे
न्हाणे ऊनऊन झळवणीने वाफाऱ्यावरती वाळविणे आंग
विंचरणे केस जाड फणीने सरळ पाडणे नाकावर भांग
नट्टीपट्टीचा सोस नाही हिला बुचडा बांधून थेटते टिळा
गोठपाटल्यांच्या हातात साजऱ्या हरिखे धरिते लोखंडी विळा
एरव्ही दिसते निब्बर राठ नेसते लुगडे घट्ट जुनाऊ
भिजताच पण एका पावसात कणकण होतो चिक्कण मऊ
भारीच सोशिक हिची वहिवाट झडीवर झड घेते सामावून
कोरडे पंधरवाडे गेले तरी साहते आतल्याआत ओलावून !

## लहरा

मी गाता तू दिलीस साथ आर्त अंतरिची
शब्दांचे ऋण फिटता अर्थाच्या नंतरची
जव्हारीत स्वरमिलाफ हुंकारुन झंझनला
लहऱ्याची फिरती लय धरित ताल धिंधिनला
निमुट निघुन गेले स्वर एकवटुन उमटवले
पलटुन आले सुवास फूल फुलुन टवटवले
निमिषमात्र थांबविला काल करुनि स्तब्ध उगा
धीट नीट दाखविल्या जीवस्वराच्या जागा
सूरसागरा भरती ये पुनवेचे उधाण
आणि आत ओहटिची माझी मजलाच जाण !

## दाद

कुणि जाल का सांगाल का सुचवाल का ह्या कोकिळा
रात्री तरी गाऊ नको खुलवू नको अपुला गळा
आधीच संध्याकाळची बरसात आहे लांबली
परत जाता चिंब चुंबन देत दारी थांबली
हार पूर्वीचा दिला तो श्वास साहुन वाळला
आताच आभाळातला काळोख मी कुरवाळला
सांभाळुनी माझ्या जिवाला मी जरासे घेतले
इतक्यात येता वाजली हलकी निजेची पावले
कळवाल का त्या कोकिळा की झार होती वाढली
आणि द्याया दाद कोणी रात्र जागुन काढली !

## एकरंग

एकरंग प्रीतिचा तयात जीव रंगला माझा
तसा कशात नाही मग जीव रंगला माझा
रंग कितिक उधळविले जगताने माझ्यावर:
उडुन सर्व ते गेले रंग राहिला माझा
न्हालो मी इंद्रधनुष्याच्या अवघ्या छटांत
बदललो जरा तरी न रंग बदलला माझा
आल्या घनघोर घटा घेउनिया गडद रंग
आसवांत धुवुन तया रंग चढविला माझा
भिजलो मी पावसात अन् उन्हात वणवणलो
प्रीतीचा नाही कधि रंग उतरला माझा !

## मी

ते सुजाणपण सारे साठवून असतो मी
तरि सहसा जगण्याच्या साहसात फसतो मी
कळते मज भावनांत वाह्वणे वेड असे
ते न लागते तयास कीव करुनि हसतो मी
सांगतात लोक मला टाक पावले जपून
पायाखालीच बघुन पण चालत नसतो मी
जिकडे मन नेत तिथे गात गात जाताना
रानातिल चकव्याला वाट अजुन पुसतो मी
सोडुन जातात पुढे सोबतिचे सर्व सखे
माझ्या मनमुकुरातच मज पाहत बसतो मी !

## पुन्हा

चटकचांदण्या रात्री येत राहतात पुन्हा
जीवपाखरू अवचित सापडते त्यांत पुन्हा
पाखरते मोहजाल एक क्षमाशील नजर
आणि रिती मधुपात्रे भरली जातात पुन्हा
ओठावर पाघळते ओले मुखचंद्र स्तोत्र
सूरातुन शब्दांचे स्रोत वाहतात पुन्हा
बाहतात हावभाव करित सकल सौंदर्ये
घाव असह सौख्याचे प्राण साहतात पुन्हा
हिंदोळत बसते मग चांदणे मनातलेच
डोळे उलटून आत रूप पाहतात पुन्हा !

## चाललो

वाटेवर काटे वेचीत चालल<br>
वाटले जसा फुलाफुलांत चाललो<br>
मिसळुन मेळ्यात कधी एक हात धरुनि कधी<br>
आपलीच साथ कधी करित चाललो<br>
आधिचा प्रसाद घेत पुढची ऐकीत साद<br>
नादातच शीळ वाजवीत चाललो<br>
चुकली तालात चाल लागला जिवास बोल<br>
ढळलेला तोल सावरीत चाललो<br>
खांद्यावर बाळगिले ओझे सुखदुःखांचे<br>
फेकुन देऊन अता परत चाललो !

## तुझ्याविना

कितीक काळ हालला असा तुझ्याविना
कळे न श्वास चालला कसा तुझ्याविना
दहिवरल्या प्रहरातुन वाट पाहते पहाट
बहर गळे दरवळला कसा तुझ्याविना
लवथवत्या पानावर गहिवरते भरदुपार
ज्वरभरला दिवस ढळे कसा तुझ्याविना
तमामधुन सावकाश उजळे आकाश निळे
चळे उदास चंद्रमा कसा तुझ्याविना
ताऱ्यांचा धरुन भार रात्रिस उरते न त्राण
स्मरणावर प्राण जळे कसा तुझ्याविना !

दशपदी

• • •

अनिल

## दशपदी : स्थल-काल-छंद

१. विराणी : दिल्ली-नागपूर प्रवास : ७·११·१९५९ : सयमक मुक्तछंद 'मानवता'
२. तदात्मता : नागपूर-दिल्ली प्रवास : ९·११·५९ : सयमक मुक्तछंद 'प्रेमजीवन'
३. एक दिवस : नागपूर-दिल्ली प्रवास : ३१·१२·५९/१·१·६० : सयमक मुक्तछंद 'मानवता'
४. आणीबाणी : दिल्ली-मुंबई प्रवास : २१/२२·३·६० : सयमक मुक्तछंद 'मानवता'
५. तळ्याकाठी : मुंबई-दिल्ली प्रवास : २५·३·६० : सयमक मुक्तछंद 'प्रेमजीवन'
६. खेळणी : नागपूर-दिल्ली प्रवास : २·७·६० : सयमक मुक्तछंद 'प्रेमजीवन'
७. पावसाळी सांज : दिल्ली-नागपूर-दिल्ली प्रवास : २/१०·७·६० : सयमक मुक्तछंद 'प्रेमजीवन'
८. दोन वाटा : दिल्ली-मुंबई-दिल्ली प्रवास : १२/१८·८·६० : सयमक मुक्तछंद 'मानवता'
९. जुई : मुंबई-दिल्ली प्रवास : १४/१५·८·६० : सयमक मुक्तछंद 'प्रेमजीवन'
१०. श्रावणझड : नवी दिल्ली : १६/२०·८·६१ : भृंगावर्तनी जाती
११. शरदागम : दिल्ली-मुंबई प्रवास : १५/१६·९·६१ : सयमक मुक्तछंद 'प्रेमजीवन'
१२. लावण्य : पुणे-नागपूर प्रवास : १९/२०·९·६१ : सयमक मुक्तछंद 'प्रेमजीवन'
१३. एकाकी : नागपूर-दिल्ली प्रवास : २२·९·६१ : सयमक मुक्तछंद 'प्रेमजीवन'
१४. साथ : नवी दिल्ली : ८/१५·१०·६१ : सयमक मुक्तछंद 'प्रेमजीवन'
१५. गतार्थ : दिल्ली-जयपूर-दिल्ली-नागपूर प्रवास : २०·१२·६१/२·३·६२
१६. माघ : नागपूर-मुंबई प्रवास : ९/११·३·६२ : भृंगावर्तनी जाती

१७. फाल्गुन : मुंबई-नागपूर-दिल्ली प्रवास : १५/२५·३·६२ : अग्न्यावर्तनी जातीचा एक प्रकार
१८. माड : नागपूर-नवी दिल्ली प्रवास : १९/२५·३·६२ : भृंगावर्तनी जाती
१९. प्रीती : बिस्केचा उपसागर—भूमध्य समुद्र : ९/१२·७·६२ : सयमक मुक्तछंद 'प्रेमजीवन'
२०. कालव : भूमध्य समुद्र : १२/१४·७·६२ : समयक मुक्तछंद 'प्रेमजीवन'
२१. उशिराचा पाऊस : माल्टा ते पोर्ट सुएझ : १४/१५·७·६२ : सयमक मुक्तछंद 'प्रेमजीवन'
२२. अदृष्ट : सुएझ ते एडन : २०/२२·७·६२ : सयमक मुक्तछंद 'प्रेमजीवन'
२३. फुलांचे आयुष्य : एडन ते मुंबई : २७/२९·७·६२ : सयमक मुक्तछंद 'प्रेमजीवन'
२४. हलन्त् : मुंबईची खाडी : २९/३०·७·६२ : सयमक मुक्तछंद 'प्रेमजीवन'
[वरील सहा कविता (क्र० १९ ते २४) वहित्र नौका 'जलराजेंद्र'मधून रॉटरडॅम ते मुंबई प्रवासात लिहिल्या आहेत.]
२५. सगर्भ : दिल्ली-नागपूर-मुंबई-दिल्ली प्रवास : २·९·६२–३०·३·६३ : भृंगावर्तनी जाती
२६. सावल्या : नवी दिल्ली : ७/१६·१२·६३ : सयमक मुक्तछंद 'मानवता'
२७. चित्र : बडोदा-दिल्ली प्रवास : ७/९·१·६४ भृंगावर्तनी जाती
२८. स्वान्त : नवी दिल्ली : २२·२/७·३·६४ : सयमक मुक्तछंद 'प्रेमजीवन'
२९. झाले : नागपूर-मुंबई प्रवास : ७·१०·६६ : सयमक मुक्तछंद 'मानवता'
३०. नाटक : मुंबई-नागपूर प्रवास : ९/१०·१०·६६ : सयमक मुक्तछंद 'प्रेमजीवन'
३१. जीवन : देवास : २९·१०·६८ : अक्षराच्या उच्चारणकालानुसार हरावर्तनी जातीचा एक प्रकार
३२. काळी : मुंबई-नागपूर प्रवास : ३१·१/१·२·६९ : सयमक मुक्तछंद 'प्रेमजीवन'
३३. लहरा : नागपूर : १९·३·६९ : भृंगावर्तनी जाती
३४. दाद : नागपूर : २८·७·७० : अग्न्यावर्तनी जाती

(स्थळ प्रत)

३५. एकरंग : नागपूर : २१·११·७० : अक्षराच्या उच्चारणकालानुसार भृंगावर्तनी जाती
३६. मी : मुंबई-नागपूर प्रवास : २९·४/३·५·७१ : भृंगावर्तनी जाती
३७. पुन्हा : नागपूर : ११/१६·९·७१ : भृंगावर्तनी जाती
३८. चालल्लो : दिल्ली-नागपूर प्रवास : २०·३·७२ : भृंगावर्तनी जाती
३९. तुझ्याविना : नागपूर : २४/२५·४·७४ : भृंगावर्तनी विषमचरणी जाती

REFBK-0021555
REFBK-0021555